म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव मोर. [illegible]

सन

C2

ना[illegible]

लेखक :- भागवत नारायण हरि

सन. १८८२

दातेसूचि पान ७०८

ग्रं. क्रं. ६८०

# मोर एल्एल्. बी. प्रहसन.

## प्रवेश १ ला.

स्थल—घरच्या चौकालगतचीं बाहेरील ओटी.

पात्रें

मोरेश्वर....एक एल्एल्. बी. चा अभ्यास करणारा.

चिंतामणी..............................त्याचा स्नेही.

पांडोबा उर्फ खवलेशास्त्री........मोरेश्वराचा बाप.

मो०—( पोशाग चढवीत आपल्याशींच. ) 'Tis disgrace no doubt !! कारण एल्एल्.बीला जाण्याची टर्म भरत आली, आणि अभ्यासतर सपाटून केला पाहिजे—but what should be done?! अभ्यासावर मनच बसत नाहीं, आणि तें मन अभ्यासावर बसण्याकरितां का आतां घाई केली—तर मग बोलायलाच नको ! मिळून असे पडलों आह्मीं पेचांत ! कारण आह्मी पडलों किताबी विद्वानांतल्या मंडळीतले ! तशांतून बालविवाहाच्या आणि स्त्रीपुनर्विवाहाच्या संबंधानें व्याख्यानांवर व्याख्यानें झोडणारे ! आणि याच कारणानें ह्मणान्—रावबहादुरासारख्या बड्या बड्या मंडळींनें, भावी देश व लोकसुधारण्याच्या भव्य व प्रचंड इमारतीचे काय जे मूलस्तंभ, ते आह्मांलाच ह्मटलें आहे ! गेल्याच रविवारीं आमचें व्या-

ख्यान झालें ना—त्यांत पण काय ह्मणता आमच्या जुन्या लोकांची टेरीटर उडवून दिली होती! माझ्या प्रत्येक शब्दाला—नाहीं, पण त्यांतील प्रत्येक वर्णाला, आमच्या बांधवांकडून सारखी टाळी चालली होती!! त्या लेक्-चराचा विचार मनांत आला, ह्मणजे वाटतें—काय हो बेटे आमचे लोक—ह्मणजे आमचेच बाप—आजे—पणजे मूर्ख होते!! I don't think I commit any sin by calling them fools त्यांना मूर्ख ह्मणण्यांत कांहीं पाप आहे असें तर मला वाटत नाहीं. कारण आमच्या पूर्व-जांना मूर्ख-महामूर्ख-पढतमूर्ख असें ह्मणण्याची तर आतां फयाशनच झाली आहे! आपल्या पूर्वजांना जो कोणी नि-दान मूर्ख तरी ह्मणणार नाहीं, तो मग कितीहि जरी वि-द्वान असला तरी तो या काळांतील शहाणाच नव्हे, असा एक रूल I mean नियमच ठरला आहे! समजा, त्यांनीं जर ही बालविवाहाची चाल सुरू केली नसती, तर आ-जच माझी स्थिती अशी कशानें झाली असती! मूर्खच! बेटे विचारशून्य! अहो—आतां तुह्माला लंबकर्ण असें ह्मणण्याला कांहीं हरकत आहे का? तुमच्याच ना हो या मूर्खपणाचा परिणाम मी आज भोगतों आहे? अगदीं नाहीं नाहीं ह्मटलें, तरी या स्वप्नावस्थेनें माझे जे हाल मांडले आहेत, ते एक आमच्या शरीराला, किंवा आमच्या

डॉक्टर साहेबांना माहित! अहो आजच मला या डोळ्यांनीं दिसेनासें झालें! लोक मला विचारतात, पशूंनों, तुमच्यातलेच थेरडेपणीं पडक्या दांतांनीं दगडी हरभरे कडाकड फोडणारे—मग तुमचे डोळे इतक्यांतच असे हो कां झाले? काय रडावें मी त्यांच्यापुढें? कां आह्माला बायको नाहीं ह्मणून असें होतें असें तोंड पसरून निर्लज्जपणानें त्यांच्या पुढें सांगावें?—पण असें तरी सांगण्याला आह्माला तोंड कुठें आहे?

पां०—(पडशी खांद्यावर टाकलेला शोध करीत येतो) त्या समूरच्या रस्त्यानें येऊन वाकडा वळल्यावर उजव्या का डाव्या हातची बरें?—पण हीच गल्लीशी वाटतें. अन् लंबर का कंबर काय तो दारावर चिकटिवला दिसतो अहि खरा. (रेखून पाहून) आणखी त्या दारावर एक कायसें लिहिलेली एक फळी टांगली आहे. पण तें वाचतां कोणाला येतें—आंत एक मनुष्य दिसतो आहे—त्यालाच विचारूं आमचा मोरू कोठे रहातो तें ठाऊक आहे कां ह्मणून? (आंत शिरतो.)

मो०—(खवले शास्त्र्याकडे पाहून.) ओहो—यावें यावें खवलेशास्त्री! बसा जरा येथेंच. आह्मी थोडेसे बाहेर जाऊन येतों. कारण नुकतेंच बोलावणें येऊन गेलें आणि जाऊन तर आलेंच पाहिजे.

पां०—( तऱ्हा पाहून आपल्याशींच ) काय हा पोर आपल्या बापाची मर्यादा ठेवतो आहे ही! वाहवारे वाहवा! मला जसा कांहीं हा शिद्द्यांतला गुलाम धरून आणला आहे असें त्याला वाटतें! मर्जी देवाची ह्मणावें आणखी काय! पण आतां येथून आपला गाशा लवकरच गुंडाळावा हें बरें. ( मुलाला लक्षून ) अरे पण तें खरें—मी आलों आहे तुझा बाप. अशी वर्दी घरांत तुझी माणसें कोण आहेत त्यांना दिलीस का?

मो०—नॉन्सेन्स! वर्दी काय द्यायची आहे त्यांत? तुह्मी कांहीं कुणी संस्थानिक नव्हत—त्यांना देखील सद्ध्यां कुणी पुसत नाहीं, मग तुमची ती काय कथा! आलात—जा आंत, भटारखाना पेटलेला आहेच, यंत्रांत दोन चोंडें आणून टाकावीं, दोन घागरी नळाचें पाणी भरून आंत ओतावें, फुंकावें, तापवावें, पाणी बाहेर काढून घेऊन आंघोळ करावी, त्या ढिगांतली एक पत्रावळ घ्यावी, बल्लवापाशीं जावें, भिक्षा मागावी, आणि स्वस्थ जेवावें. खवलेशास्त्री, तुह्मी ८० वर्षाचे थेरडे झालांत, अजून तुह्मांला प्रवासांत कसें वागावें हें कळत नाहीं, मोठेंच आश्चर्य ह्मणायचें! Really 'tis a great wonder—one of those!!!

पां०—( मनांत ) एकून ही आमची आह्मीच पूर्वपूजा करून घेतली ह्मणायची! हा कार्टा उत्पन्नच झाला नसत

तर फारच चांगलें झालें असतें—पण दैवगतीच आपली विचित्र, त्याला काय कुणी करावें ! !

मो०—खवलेशास्त्री, बरी आठवण झाली. तुह्माला दोन तीन पत्रांत 'देशमुख' 'देशपांडे' वगैरे लोकांची अशीं आडनांवें कधीं पडलीं, आणि तीं तशीं पडण्याचीं कारणें काय—वगैरेचा शोध करून लिहून पाठवा ह्मणून लिहिलें होतें, त्याचा अद्याप जाब पाठविला नाहींत !

पां०—हूं ( खोकूं लागतो )

मो०—( रागानें ) मी काय विचारतों आहे, आणि आपण हूं आणि खोखो करीत उत्तराऐवजीं चावटपणा चालविला आहे !

पां०—बरें बावा चावटपणा चालविला आहे !

मो०—बस्स, Hold your tongue तोंड धरून बस। आतां उगीच. या बातमीकरतां तर रोज उठून आमच्या पाठीमागें लकडा लागला आहे. आणि ही बातमी मुद्दाम एका वजनदार पत्राला द्यायची आहे. असें असतां तुमच्या हातून येवढेंसे देखील काम झालें नाहीं ! आणि पैसे पाठवा, पैसे पाठवा—ह्मणून मात्र प्रत्येक पत्रांत तुमचा तगादा लागला असतो.

पां०—काय ती आमची मदार सारी आतां तुझ्यावरच आहे ना !

मो०—पण मी तुमच्या बारशाला पाणी प्यायलों आहे ! खवलेशास्त्री, तुह्मीच सांगा, कीं तुमच्या प्रपितामहांनीं येथें फुकट पैसे लोंबते आडकावून ठेवले आहेत—ते तोडावे आणि तुमच्याकडे पाठवावे ? पैसे मिळवायला हीं अशीं हाडें झिजवावीं लागतात, तेव्हां पैसे मिळतात ! अहांत कुठे ? श्राद्धें झोडून दक्षणा आणायचें हें काम नाहीं.

पां०—बाबारे, तूं आतां चार बुकें साहेबाचीं शिकलास, तेव्हां आमचें सगळेंच तुला वाईट दिसूं लागलें ! ' देशमूख ' आणि ' देशपांडे ' यांच्या मूळपीठिकेचा शोध करायला मात्र गेलों तों त्या लोकांनीं माझी फटफजितीच उडवून दिली. चार लोकांत मला तोंड काढण्याची पंचाईत झाली, असले तुझें त्यांत प्रश्न होते ! आह्मीं पडलों जुने लोक, असले कारभार आतां आमच्यानें आंवरत नाहींत. तुह्मीं नवे लोक अहांत, या कोकणांत आणि करा शोध. ( चिंतामणी येतो )

चिं०—Well Mr. Mor, ( नवीन आलेल्या मनुष्याकडे पाहून ) who is this venerable old man ? I think your father, who was expected by this time here ( नवीन मनुष्याला ) मला वाटतें आपण मोरेश्वराचे वडील ?

मो०—Oh no-he is a man from our country.

पां०—होय-मोरेश्वर माझा मुलगा. मी याच्या समाचारास आलों.

चिं०—तेंच मी विचारीत होतों. ( मोरेश्वराकडे वळून ) I think then Mr. Mor, he must have brought the desired information. ( पांडोबाकडे वळून ) मला वाटतें, आपल्याला जो कांहीं शोध करायला लिहिलें होतें, त्या संबंधानें विचारपुस करून आपण आलां असाल.

मो०—( मध्येंच ) Oh no-fool he is-we will get it when we go ourselves. These are not the men who could supply us the information we require. These are old brutes and a burden to the earth! Well let that go now. I am just going to Dr.,- नाहीं रे बुवा, स्वतः आपण जाऊन मेल्यावांचून या थेरड्या बैलोबांच्या हातून आपल्याला बातमी मिळायची नाहीं–पण ते राहूं दे सद्ध्यां–मला डॉक्टरकडे जायचें आहे.

चिं०—कां कां आज डॉक्टराच्या घरींसे ?

मो०—खवलेशास्त्री, ती पडशी घेऊन तुह्मीं जा आतां आंत. उगीच रिणायत्स्वरूप्यासारखे डोक्यावर हात टेंकून चार चौघे येथें येतात तेथें बसूं नका. ( खवलेशास्त्री आंत जातो. ) अरे चिंतू, I cannot but speak to you

काय करावें—तुझ्या जवळ बोलल्यावांचून मला रहा-वत नाहीं.

चिं०—हा एवढा गुलदस्त कशाचा आहे बुवा ?

मो०—आतांशा सकाळचे बुवा आपल्याला अगदींच उठवेनासें झालें आहे !

चिं०—कारे बुवा ? ह्मटलें तर तुह्मी सडीवाले ब्रह्म-चारी ! तशांत नवे तरणे, एजुकेटेड् आणि पटांतले शहाणे, तेव्हां आपल्याकडून अशी कुरकुर असूं नये—खरें कीं, नाहीं ?

मो०—अरे स्वप्नावस्थेचा फार उपद्रव झाला आहे !

चिं०—आणि आपल्याला ? माझे तर कान बुवा असें ऐकत नाहींत.

मो०—फारच किती ह्मणून विचारशील, तर मात्र सां-गतां येणार नाहीं । त्याकरितां मी कित्येक रात्रीच्या रात्री या धास्तीनें निजत देखील नाहीं.

चिं०—काय ह्मणतोस ? झोंप घ्यायची देखील सो-डलीस ना ?

मो०—पण चुकून एकादे वेळेस डोळा लागला, कीं पुरे–लगेंच उठून स्नान करावें लागतें, आणि पलंगपोस धुवायला टाकावा लागतो !

चिं०—वा: ! तर मग ही स्वत: तमचीच आधीं उत्तम

सुधारणा झाली–आणि आतां मात्र तुह्मी आपल्या बांधवाची सुधारणा कराल खरी !

**मो०**—मग! त्यांत काय संशय आहे ? तूं असें नको समजूस आं–

**चिं०**—रडा आतां असेंच ! धरा एकाद्या दिवशीं सोनापुरची वाट, आणि ह्मणा राम ! मोर नाचायला लागला, लांडोर उड्या मारतो–जमावें कसें ? मोराचें मोराला लांडोराचें लांडोराला. थंड हवेच्या मानानें ह्मणा, किंवा त्यांच्या रूढीला अनुसरून ह्मणा, किंवा तुह्माला चार दिवस नाचिवण्याच्या हेतूनें ह्मणा, कोणीं बालविवाह वाईट, दुःखदायक, देशाचा शत्रु ह्मटला, ह्मणजे शहाण्यानों, तुह्मीही पण विचार केल्यावांचून त्यांच्याच सारखे बडबडायला लागून उड्या मारायला लागणार ! तुमच्या देशाची हवा उष्ण, तुमचे आयुर्मान कमी, तुमच्या लग्न करण्याच्या पद्धती निराळ्या, वगैरे गोष्टींचा कांहीं एक विचार न करतां डोक्यांत राख घालून बसायचें, आणि मग लागायचे डॉक्टर घुंडाळायला ! हेंच जर पांच वर्षांच्या पूर्वी तूं लग्न करून टाकतास, तर तुझ्या डोळ्यांची, आणि तुझी अशी कां दशा झाली असती ? ही तुझ्या आंगाची बरगड्यान् बरगडी कां दिसली असती ? हें तुझ्या पाठीला पोक कां आलें असतें ? जाळा नेऊन चुलींत त्या तुमच्या एलएल. बी. च्या परिक्षेला ! मसणवटांत लांकडें आधीं पाठवा,

आणि मग खुर्चीवर परिक्षेला बसा—असली ही जिवंत प्रेतें तुह्मी ! !

मो०—( रागानें ) नॉन्‌सेन्स !

चिं०—तें नॉनसेन्स नाहीं आणि विन्‌सेन्स नाहीं— तुमच्या सारख्यांचा असून नसून या जगाला, किंवा तुमच्या कुटुंबाला कांहीं उपयोग नाहीं. गृहस्था, तो तुझा बाप आला—जसा कांहीं तो तुझा कुणीच नाहीं अशा प्रकारानें तर तूं प्रत्यक्ष माझ्या जवळ सांगतोस ! ! काय तरी या तुमच्या असल्या नाड्या विद्वत्तेला ह्मणावें—बापाची लाज तुह्माला वाटूं लागली ! ! !

मो०—चिंत्या, हें पांडित्य आतां पुरे कर. आपल्या मनांत तर आतां लग्न करायचें फार भरलें आहे.

चिं०—तुमचे सभेचे कांहीं नियम मध्यें आडवे येतील त्यांची वाट लावा आधीं—

मो०—अं: ! त्यांत काय आहे ? प्रत्येक नियमाला कांहीं तरी अपवाद आहेच. आमचा थेरडा बाप मरायला टेकला होता, आणि त्याच्या आग्रहास्तव केलें ह्मटलें ह्मणजे झालें. फारसें झालें तर मंडळीकडून ‘ सेन्शर ’ येईल, पण असल्या पुळपुळित मंडळीनें केलेल्या नियमाचें उल्लंघन केल्याबद्दलच्या दोषाची पर्वा कोण करितो ?

चिं०—एकूनें लग्नाकरितां तूं शपथ घेतलेला नियम मोडशील तर ?

मो०--अरे मीचसा काय ? आणि मलाहि पण त्या बद्दलची भीती कां असावी ? रेकार्ड तपासून पहातां असें दिसतें कीं, ज्यांच्या ज्यांच्यावर ह्मणून कांहीं प्रसंग आले त्यांनीं त्यांनीं त्याना वाटले तितके नियम खुशाल मोडले आहेत ! आमच्या लोकात ही वहिवाट कशी चालत आली आहे, ती तुला नाहीं वाटत ठाऊक ? आमचे सुधारणुकीचें प्रत्येक कलमच असें आहे कीं, त्यांत सोईकर अपवाद ठेवून दिलेलच जसें कांहीं !

चिं०--एकून वाहवा वाहवा ! तुह्मी नवीन सुधारकांनीं तर आमच्या जुन्या शास्त्रकारांस मागें हटविलेंत ! सचोटी, न्याय, आणि व्यवस्था त्यांनीं सांगितली. तुह्मी सगळें त्यांच्या उलट, परंतु स्वतःच्याही उलट हें त्यांत तर बुवा मोठें नवल !

मो०--अरे राहूं दे तें सगळें धर्मशास्त्र. आमचा देखावा बाह्यातकारी जो आहे, तो निराळा असून आंतला जो आहे तो असा आहे. आतां माझ्या लग्नाची गोष्ट बोल ह्मणजे झालें.

चिं०--मग करा, ना कोणाची आहे ? मार्गशीर्ष महिना आलाच आहे जवळ. वडिलांना मुलगी पहाण्याकरितां लवकर परत पाठवा. त्यांनीं मुलगी पसंत केली कीं लग्नाचा बार दिलाच उडवून. त्याला काय उशीर ! आणि पुढचें वर्षी आपली एलएल. बी. ची परिक्षा पास

होते आहे, तो आपल्या मडम साहेब वयांत येऊन मुंबईत ठेवलेल्याच ! काढा आतां झोंप घेऊन दिवस कसे तरी तोंपर्यंत.

मो०—लग्न तर यंदा करायचें ठरलेंच—*But it* must be of choice. I don't want that old man to see a small girl for me, who will not know even how to read and write, uneducated foolish girl?

चिं०—त्या झाताऱ्यावरची ही घोरपड काढून, 'दर्शन-विवाह' कराल तर मी ह्मणतो सोन्याहून पिंवळेंच होईल. कारण, मग त्यानें लहानच मुलगी पाहिली, ती शाळेंतच जाणारी नव्हती, तिला लिहितांच येत नाहीं, तिला वाच-तांच येत नाहीं—अशी मग कुरकुर रहाणार नाहीं. मी ह्म-णतो, आपली जुनी पद्धत मोडेना कां—पण असें तरी करून आपलें एकदां लग्न करून घ्या ह्मणजे झालें.

मो०—But I can't go in search of her—

चिं०—मग कसें करायचें बुवा ! तुला मुलीचें तर शि-लेकशन् करायला पाहिजे, आणि पहायला जायचें नाहीं ह्मणतोस. मग ही तुझी रिकामी दलाली करतो कोण ?

मो०—Oh fear not—काय लागेल तो खर्च आ-पण देऊं.

चिं०—मग आमच्या गांवच्या बचंभटाला लिहि ह्म-

ह्मणजे झालें. तो तुझ्या मनांत आहे तशी सगळी तजवि-ज करून तुला लिहून पाठवील, ह्मणजे नुस्ती हातांत एक कार्पेटब्याग घेऊन जावें, मुलगी पसंत करावी, लगेच लग्न लावावें, आणि त्याच पावलीं परत मुंबईस यावें.

मो०—But I must send this old man home to day. There is no use of his staying here when I am to go to my native place Is it not so? अहो खवलेशास्त्री, जरा बाहेर या पाहूं. आह्मी जातों आहों आतां बाहेर. तुह्मी येथें आलां—पण तुमचा आ-ह्माला बिलकूल उपयोग नाहीं! आह्मीं मार्गशीर्षाच्या म-हिन्यांत लग्न करण्याकरितां घरीं येणार आहों, तेव्हां तुमची आमची गांठ पडेलच, आणि मग तेथें तुह्मी आ-ह्माला भेटा. आज संध्याकाळीं ५ वाजतां निकलची आगबोट जाणार आहे, तिच्यांत बसून तुह्मी जा, आणि लग्नाच्या बाबतींत मी हें पत्र लिहून देतों, ते बचंभटाला नेऊन द्या. तुह्मीं मात्र या खटपटींत अगदीं पडूं नका. (पत्र खरडून देतो) हें घ्या. हं चला आंत. बोडकें बुचकळा पाण्यांत, खा थोडेसें आणि लगेच आगबोटीवर निघा. ह्मणजे रस्ता चुकलांत तरी शोध करण्याला वेळ राहील. आह्मीं आतां चाललों बाहेर, पण आह्मीं ये-ण्याची वाट पहात घरीं बसूं नका. हं चला जा आंत. अजून गेले नाहींत? (चिंतूसह जातो.)

पां०—( आपल्याशींच ) मी खरा वेडा ! आपला येवढाच मुलगा हा, फार आजारी पडल्याचें ऐकिलें, तरी ती ह्मणतच होती, कीं मुलाचें पत्र येऊं द्या आणि मग जा. तिला ठाऊक, कीं हा असलें खुळे चाळे करणारा पोर झाला आहे. पण तें नाहीं मी तिचें ऐकिलें ! कां, कीं या आमच्या ह्मातारपणांत ( डोळ्यांला पाणी आणून ) एवढाच एक मुलगा राहिला आहे, आणि त्याला परक्या देशांत कांहीं बरें वाईट झालें, तर आपलें ह्मणून कोणी कळवळ्याचें नाहीं, ह्मणून मी धांवत आलों. माझें तरी येण्याचे का दिवस ! पण आम्हाला त्याच्या हातून मूठभर गोळा मिळायचा आहे, ह्मणून तो सुखी असावा, आपण त्याला डोळ्यांनीं पहावें, तो अमक्या अमक्याचा मुलगा चांगला आहे, असें चार लोकांनीं बोलावें, आणि तें जिवंत पणी आह्मीं कानांनीं ऐकावें. झाली—पुरली हा माझी आशा आतां ! ! आज येण्याबरोबरच माझे सगळे सोपस्कार झाले ! पितृभक्तीची तर त्यानें कमाल करून सोडली ! देवा ! माझें हें पोर जिवंत रहावें ह्मणून मी तुजपाशीं नवस कां केलें होतें ? दहा पोरें मेलीं त्यांत हें ही जातें, तर आज मला इतकें वाईट वाटलें नसतें ! हा तुझ्याकडे तरी काय ह्मणून बोल लावावा ? हा माझ्या नाशिबाचा बोल. परंतु नाशिबाला तरी हा बोल काय ह्मणून

लावावा ! हा माझाच दोष. मी मूर्ख, ह्मणून लोक सांगत होते त्याजकडे दुर्लक्ष्य करून, पुत्रप्रेमानें याच्या समाचाराला आलों. नसतो आलों, तर हेच चार लोक मला हांसते, आणि ह्मणते, ' पहा हो हा थेरडा, पोराची अत्यावस्था झाली होती तरी समाचाराला देखील आला नाहीं ! ' असो. आतां मला मुलाच्या भेटीचें समाधान मानण्यासारखें तें एवढेंच आहे कीं, त्याला आज माझ्या डोळ्यांनीं मी खुशाल पाहिला. तो बापावर प्रेम करो अगर न करो, तो प्रकार तर आतांच झाला. हा टोपीवाल्यांच्या विद्येचा गुण ह्मणा, अथवा हा आतां असाच काळ यायचा ह्मणा. अपल्याला तर इतःपर याच्या येथलें अन्न खाणें नको. मुलाच्या प्रेमानेंच आपलें पोट आकंठ भरलें. आपली पढशी टाका खांद्यावर आणि चला कसे याच पावलीं परत. कृष्णंभट दीक्षिताला भेटायचें होतें, पण आतां त्याला भेटायची वेळ नाहीं, तो भेटल्यावर आपल्याला कांहीं लवकर जाऊं देणार नाहीं. असो, मुलानें पत्र तर लिहून अंगावर फेंकलेंच आहे, आता त्याचा तोच आपलें लग्न करील. सुटलों आपण त्याच्या कचाट्यांतून. येथें कोणाला आतां भेटणें नको आणि कांहीं नको. उठाच कसें या तिरिमिरी सरसें, आणि करा सगळ्यांना येथूनच नमस्कार. ( जातो. )

———

# प्रवेश २ रा.

## पात्रें.

बचंभट............लग्न जुळिवणारा एक भिक्षुक.

खवलेशास्त्री.........................मोरेश्वराचा बाप.

साळू...........लग्न जुळाविण्याच्या कामांत खटपट करणारी एक विधवा स्त्री.

कोकणांतील बचंभटाचे घरांतील पुढची पडवी.

ब०—नमस्कार ! नमस्कार !! शास्त्रीबुवा, आज कोणीकडे येणें झालें हें ? आपलें वृद्धपण झालें-कां आतां फिरण्याची मेहेनत करतां ?

ख०—हा घ्या बुवा तुमचा पैंढ आमच्याकडे आला आहे.

ब०—( पत्र हातांत घेऊन फोडून तसेंच ठेवतो ) अहो, या पत्राकरितां मी आपल्या घरीं आलों असतों. छे छे बुवा, आपण आज हा दोन कोसांचा फेरा घेतला, बरें नाहीं, शास्त्रीबुवा, आह्मीं आपल्याजवळ कोणी परकी कां आहोंत ? बरें स्वारी मुंबईहून कधीं परत आली ? मोरेश्वराला ताप येत होता, तो आतां बरा झाला का ? मोरेश्वर एकून तुमचा मुलगा फार दाणा निघाला ! धन्य तुमचें नशीब ! जो कोणी मुंबईहून येतो, तो त्याची तारीफच करीत

सुटतो. दोन दोन हातांनीं बुकें उचलणार नाहींत, असलालीं मोठीं बुकें रोज त्याच्या खांकेंत असतात ! आणि तो मोठमोठ्या साहेब लोकांशीं बोलायला भीत नाहीं ह्मणतात ! त्याचा काय मोठा मान झाला आहे मुंबईत !

ख०—लोक सांगतात त्या गोष्टी खऱ्याच ! तो आत मोठा झाला आहे !

ब०—सगळें राहूं द्या तें आधीं, पण तो प्रकृतीनें खुशाल आहे ना ? शरीरानें धड, तर तो काय पाहिजेल तें करील.

ख०—माझीं १० पोरें गेलीं त्यांतलाच हा मी समजतों. आहे खुशाल; त्यानेंच हें पत्र तरातरा शाई आणि एक पीस घेऊन तुह्माला लिहून दिलें आहे.

ब०—बरें बुवा ! नशीबवान् खरे तुह्मीं, इतक्या मुलांतून एकच राहिला, पण कसा गाळीव ! एकूण खरा शंकर प्रसन्न ह्मणायचा तुह्मांला !

ख०—मुलाविषयीं ह्मणतां ना, दाणा पण दाणा खरा.

ब०—यंदां आतां त्याचे दोन हाताचे चार हात टाका कसें करून ! मोरेश्वर आतां २२ शीच्या जवळ आला असेल नाहीं कां ? आतां तर तो चार पैसे आपल्या हिमतीवर मिळवूं लागला. त्याला चार लोक कुठें गेला आला तर या बसा ह्मणत असतील. अजून किती दिवस तुह्मी

त्याला असाच ठेवणार ! बरा राहिला तर बरें, नाहीं तर ती आहे मुंबई, गडी पडला उमेदवार, कांहीं भलतेंसलतेंच झालें; ह्मणजे पंचाईत आपल्यालाच ना !

ख०—भटजी आतांचीं मुलें आहेत शहाण्यांतलीं शहाणीं ! त्यानें काय पत्र लिहिलें आहे तें वाचा एकदां, आणि करा तुह्मीच तयारी ह्मणजे झालें. मी येतों आतां.

ब०—छे छे, शास्त्रीबुवा, हे काय असें ! आपण त्या तजविजींत पाहिजेतच. मी एक त्याच्या योग्य मुलगी पाहून ठेविली आहे, कीं त्यानें पण ह्मणावें वः !

ख०—तर मग दिवस आले आहेत आतां जवळ, ठरवा आणि त्याला पत्र ल्याहा.

ब०—बरें तर शास्त्रीबुवा, आपण आतां स्वस्थ असावें लग्नाच्या संबंधानें आपण अगदीं कांहीं काळजी करूं नये. आपलें कार्य माझेंच आहे, असें समजून मी खटपट करतों.

ख०—( मनांत ) आपलें बोलणें हा भोळसरपणाच समजला हे ठीक आहे. ( मोठ्यानें ) बरें तर. बचंभट, येतों आतां. ( जाऊं लागतो. )

ब०—नमस्कार, नमस्कार, येतां तर आतां. या आं मोठी कृपा केलीत. ( पत्र हातांत घेऊन ) याच्या लग्नाच्या कामांत मेहेनत घेतली असतां फुकट जाणार नाहीं

असे मोरेश्वर म्हणतो. त्याला काय आतां कमी आहे ! सहज दोनशें रुपये सांगितले तरी देईल. पण आपल्याला ते मिळतात कसे ! बाबा गाडगिळांची मुलगी पडली तुफान आणि हें पडलें खुजट आणि क्षयी पोर ! त्याला पाहण्याबरोबर नाकारतील. पण याच्याजवळून आणि याच लग्नांत तर आपल्याला रुपये उपटायचे, मग काय होईल तें होवो. पोरगी रंडकी झाली तर ह्मणतात नाहीं, माझ्या बाचें काय गेलें ? युक्ति लढविल्यावांचून हा घाट रंगावर यायचा नाहीं. पण या कामांत साळूची मदत अवश्य घेतली पाहिजे. नाहीं तर, न जाणों, ती द्यायचीच तिकडे बिना फांसून. ( इतक्यांत साळू दृष्टीस पडते, तिला हांक मारतो. )

सा०—कां भटजी, आज फार दिवसांनीं शीं साळूबाईची आठवण झाली ? ती तरी काय, मी दरवाज्यावरून जातच होत्यें, नी मुद्दाम आंतच पाहिलं ह्मणून साळूबाई या. नाहीं तर साळूबाई कशाला आतां हावी, तिचे कां आतां ते दिवस आहेत ?

ब०—ते दिवस असते आणि हे दिवस आले ह्मणून झालें काय ? साळूबाई होत्या त्याच आतां आहेत, आणि बचंभटाहि पण तोच आहे. कां असेंचना साळूबाई ?

सा०—मी बाई कुठें तुमच्या तोंडाबरोबर टिकणार ! बरं पण हांका कां मारलीत ! मला बाई उशीर होतो देवाला जायला.

ब०—एक शिकार साधायची आहे. (पत्र दाखवून) हें पहा.

सा०—मेलं, नाहीं तेंच ! हा थट्टेखोर स्वभाव तुमचा जाणार कधीं भटजी ? तो लांडगा, का ससा, का वाघ, का सिंह, का सांबर, का हरिण, कशाची तरी बाई शिकार ही !

ब०—साळूबाई तसली शिकार नाहीं.

सा०—मग ?

ब०—लग्न जुळवून देण्याची !

सा०—मेल्यांनों ! लग्न जुळवून देण्याला का शिकार ह्मणतात ? ऐकावें तें तें बाई नवलच !

ब०—तें तसंच लग्न जुळवायचें नाजुक काम आहे.

सा०—मग जुळवा, तें साळूबाईला कशाला सांगि-तलें पाहिजे ?

ब०—साळूबाईच्या मध्यस्तीवांचून तें जमण्यासारिखें नाहीं.

सा०—हारपन्नाच्यो, मी बाई आतां शपथ घेतली आहे. लग्नाच्या गोष्टींत ह्मणून बोलायचं नाहीं. झालं आजपर्यंत तितकं पुरे. ज्यानं त्यानं ह्मणावं, हें साळीनं, त्या रांडबोडकीनं लग्न जुळवलन्. नकोग बाई असले शिव्याशाप मला आणखी कोणाचे ? मिळाले तितके पुरे झाले हो भटजी. आणखी नका मला त्या भरीस घालूं.

ब०—साळूबाई, ही तसल्या शिव्याश्रापाची जुळवाजुळव नाहीं, हा नवरा आहे वीस वर्षांचा, आणि इंग्रजी शिकलेला. कसला पण फरडा! ज्याचं नांव तें!

सा०—विंग्रजीत फरडा ह्मणून करायचं काय! कोण सांगा तर खरं; पण मेली ही उठाठेव हवी कशाला मला!

ब०—आधीं शपत द्या, मग सांगेन.

सा०—नका का बापडे सांगा‌न्, कुंभाराचं गाढव उकिरड्यावर आल्यावांचून कां रहाणार? लग्न झाल्यावर तर मला कळेल ना?

ब०—साळूबाई, तुह्माला तर तें आधींच सांगायचें, पण–

सा०—पण कशाचं? मी स ह्मणतां स्वर्गाला जाऊन पोंचणारी बायको! तो मेला मरतुकडा मोऱ्या, खवले शास्त्र्याचा मुलगा असेल! दारूबाज छाकट कुठला सगळ्या मुंबईचा! नुकतेंच परवां दामले आले, ते सांगत होते–हो ना पण? तोच ना तुमचा मुलगा? आणि त्याचंच ना तुम्ही लग्न जुळिवणार? मरेना तो मेला? मी तर बाई अशा मुलाला देण्यापेक्षां मुलीला विहिरींत ढकलून द्यायाला तिच्या आईबापांना सांगेन.

ब०—साळूबाई, भलतेंच बोलूं नका. याकरितां तर मी तुह्माला मध्यस्त घेणार. तुह्मी आणि मी एका बाजूला

झाल्यों, ह्मणजे ब्रम्हदेवानें दिलेल्या गांठीदेखील तोडून टाकूं ?

सा०—शपत घेतली तेव्हां माझ्या तोंडात सूत होतें—बरें पण काय त्यांत फायदा ?

ब०—तुह्मी सांगाल तो—निम्मेनिम वांटून घेऊं. मग तर झालें ना ?

सा०—द्या तर तें तुळशीपत्र तोडून मला ?

ब०—( तुळशीपत्र तोडून देऊन ) झाली कां खातरी आतां ?

सा०—आतां ल्याहा तुह्मी वेलाशक जुळल्याचं पत्र, आणि हावी त्याची मुलगी असूं द्या, लग्न ठरलं माझ्याकडून.

ब०—घेतलात पतकर. पहा हो—हिवरेकर बाबा गागिळांची मुलगी, ती गोदी, आहे ना ठाऊक ?—कशी उफाड्याची पोर आहे ती ! आणि तुम्ही ओळखला तोच मुलगा—खुजट आणि अशक्त आहे खरा.

सा०—मला दोन सल्ले नि एक तीन तोळ्यांचं जोडवं यांत निघालं, म्हणजे झालं. भटजी, माझी कांहीं मोठी भुक नाहीं—हें माझं जमत असलं म्हणजे मुलगा कसाहि असू द्या—मुलीच्या घरच्या माणसांच्या कानांत मंत्र फुंकण्याचं काम माझं, नाहीं तर पहा हो, तें मी जुळूं देणार नाहीं. आधीं कडू नि मग गोड तें बरं.

ब०—मला पण त्याची काळजी आहेच कीं नाहीं ? मी कां कानांत तुळशीपत्र घालून बसणार ! माझ्या मुलाची यंदाच केली पाहिजे आहे मुंज, आणि त्याकारितांच मी कांहीं घबाड पहात होतों, तें हें पहा आनायासेंचें कसें हातीं आलें !

सा०—बरं तर जाऊं मी, ठरलं ना मी म्हटलं तसं ?

ब०—तुमचें जोडवें आणि सल्ले माझ्या पेटींत आहेत समजा !

सा०—माझा देव आतां हाच. मी ही निघालें गाड-गिळांच्या घरीं. आज बाहेर निघतांना शकून चांगला झाला होतासा वाटतं ! मी आतां पुराण त्यांच्याच घरीं जाऊन सुरूं करतें—तुम्ही मात्र लवकर या—पण अवचित आल्या-सारखें हो !

———

## प्रवेश ३ रा.

पात्रें.

गोदावरी..........बाबा गाडगिळांची मुलगी, आणि दुसऱ्या मुली.

बाबा गाडगिळ........गोदावरीचा बाप.

चिमाताई..............बाबा गाडगिळांचें कुटुंब.

बचंभट...............लग्न जुळिवणारा भट.

साळू ...............लग्न जुळिवणारी विधवा.

स्थळ--बाबा गाडगिळांचें घर-पुढची पडवी.

गोदी०--का साळूअक्का, आज ठमकत ठमकत आपली स्वारी कुणिकडे ही ? या, बसा. आम्हीं गाणीं म्हटलीं, आतां सगळ्या पोरी फुगड्या खेळणार आहोंत-तुम्ही येतां कां ?

सा०--अग, आज तुझ्याचकरितां नि तुझ्याचकडे हो गोदे ही मी आलें !

गो०--आहां, काय तरी बाई ! जसं कांहीं कुणी खरंच म्हणेल हो ! साळूअक्का जशा कांहीं आतां आमच्यांत फुगड्या खेळणार, गाणी म्हणणार, म्हणून त्या माझ्याचकडे आल्या हो !

सा०--अग आतां ही साळूअक्का कीं नाहीं, तुझ्याबरोबर गाणीं म्हणायला, फुगड्या खेळायला, तुमच्या पोरींत येणारी नाहीं, म्हणून जसं कांहीं तुझ्याकडे येण्याला तिला कांहीं कामच असूं नये ना ?

गो०--दुसरं तें काय काम बाई आमच्यासारख्या पोरीजवळ तुमचं मोठ्या बायकांचं असायचं ?

सा०—हो अशी पुस्ती हो—म्हणजे सांगतें. ( गोदीची हनुवटी धरून ) अग, तुझ्यासारख्या शिकलेल्या मुलींची शिकलेल्या मुलांजवळ की नाहीं,—चालूं कां आतां पुढें, तींच आतां आमचीं तुमच्याजवळ कामं हो !

गो०--( हांसत व लाजत ) जा बाई मेलें, कांहींच्या बाहीच ही साळूअक्का बोलते !

सा०—नवरा पहायला आलो म्हणजे हातांत हात घालून गोष्टी सांगत उभी रहाशील, तेंव्हां सांगेन हो साळूअक्का काय बोलतात ते !

गो०--जा बाई मेलं, हिची थट्टाच सारी ! आम्हांला खेळूं दे.

सा०--( हांसत ) गोदे, मी तुला खेळायला नको कां म्हणते ? मी देखील पाहिजे तर तुझ्याबरोबर खेळूं लागतें. हूं, ये. खेळ पाहूं फुगडी, ( फुगडी खेळूं लागतात ) गोदे मला पाहूंबिहूं नको हो !

गो०--मी नाहीं बाई साळूअक्का तुझ्याबरोबर फुगडी खेळत.

सा०--हाटलीस तूंच कां ? आमच्यासारख्या बायकांना फुगडी खेळणंच आतां शोभत नाहीं, बरं, चिमाताई आहेत कां घरांत ?

गो०—जा, ती मागच्या ओसरीवर बसली असेल–पण आह्मीं दांडगाई करतों ह्मणून तिला सांगूं नकोस हो.

( साळू आंत जाते–खेळ पुन्हां सुरू होतो. )

सा०—तांदुळ निवडणं चाललं आहे वाटतं चिमाताईचं. उगीच कधीं बसायच्या नाहींत ।

चि०—या तुह्मीं साळूबाई, आज फारा दिवसानंशा आल्यात ! वाट चुकलां वाटतं इकडे ?

सा०—मेलं असं हो काय ह्मणतां चिमाताई ? नुकतीना कधींशी संक्रुणाच्या दिवशीं आलें होतें ! मेलं माझ्यासारखं असं माणुस झालं, ह्मणजे त्याला कुणी कांहीं तरी बोलावं !

चि०—आज कुणीकडे तरी आल्या होत्यात ? कांहीं तरी उद्योगावर आल्या असाल । तुह्मीं कांहीं उगीच यायच्या नाहींत।

सा०—नाहीं हो–उद्योग कसला ? घरीं चैन पडेना नि जिवाला वाटलं चिमाताईना भेटावं.

चि०—नाहीं. तरी पण, उगीच बऱ्या याल तुह्मी

सा०—शपतच तर उगीच. पण ताई लाडू कधीं आतां खायला घालतां ?

चि०—करायला कंबरा बांधा; या, रावा, नि खा.

सा०—माझी तर मार्गशीर्षाच्या महिन्यांत दिखील तयारी आहे. हात्तीच्यारे ! मी पाहिजे तर हजार पानांच्या दिखील बुंदी एकटी पाडीन ! गोदीला तेरावं वरिस उलटून गेलं, अजून कुठें तिच्या लग्नाची जुळवाजुळव तुह्मीं करित नाहीं याला ह्मणावं तरी काय ?

चि०—काय बाई आमच्या गोदीच्या नाशिबीं आहे कोण जाणे ! दहा पांच ठिकाणीं तिचीं टिपणं गेलीं आहेत, अजून कांहीं कुठून रुकारसा येत नाहीं. आमच्या इथें तर रात्रंदिवस मोठी काळजी लागली आहे कीं कसं होईल? नि पोर तर आतां गळ्याशीं लागली ! लांबणीवर टाकतां येत नाहीं, तशांतून दिवस तर आहेत असे !

सा०—तुह्मांला सांगूं कां मी आतां ? कसं सांगावं मेलं ह्मणून मी ह्मणत होतें, पण न बोल्लें, तर तुह्मींच मला शब्द लावाल. पहा हो, ही साळी—आमची आमची ह्मणवते, नि आमच्याविषयीं गांवांत कुणी कांहीं बोल्लं, तर तिला ठाऊक असूनही कळवीत नाहीं. पण मी याकरितां नाहीं हो आज आलें. आतां ओघानंच गोष्ट निघाली ह्मणून सांगणार, तुमची गोदी शाळेंत का जाते ?

चि०—हो. अग तुला नाहीं का ठाऊक ?

सा०--मला नवतं हो खरें वाटत—ती शाळेंत जाते ह्मणून तिला कुणी पतकरीत नाहींत। जें तें आतां असं ह्मणतात, की तुमची गोदी शिकली आहे ल्याहायला—नवलच बाई ! ती आतां आपल्या नवऱ्याला भाक्री भाजायला लावील !

चि०—हा मेल्यानों। जळ्लीं मेल्यांचीं तोंडं। पोर ल्याहायला शिकली ह्मणून झालं काय ? माझ्या कानीं नाहीं बाई असं आलं !

सा०—खरंच, तुमच्या तोंडावर कोण असं बोलेल ? मागून मात्र मेले शेण खातात। खरंच कनई मीं दहांच्या तोंडून ऐकलं, नि माझ्या अंगाचा असा तिळपापड झाला, कीं सांगतां पुरवत नाहीं. या मेल्यांची खोडच मोडावी-पण गोदीला नवरा तिच्या नशीबानें असा मिळावा, कीं सुरेखसा, २९ शीच्या आंत, विंग्रजी शिकलेला, स्वत: मिळिवणारा, वेगळा रहाणारा, नि एकटा—ह्मणजे जे लोक नाकानं कांदे सोलतात, त्यांच्याच पैकीं मुलगा मिळवा, मग तर मेल्यांची चांगलीच खोड मोडेल. कांहो, शाळेंत जाऊं लागल्यापासून गोदी धिट का झाली आहे ? ( इतक्यांत बाबा गाडगीळ येतात. त्यांना पाहून साळू मुरका मारून उभी रहाते. )

बा०—कोण, आज या साळूबाई कां आल्या आहेत ?

सा०—( तोंड फिरवून गालांत हांसत उभी राहते. )

चि०—तिला साळूबाई तें कशाला ह्मणायला पाहिजे होतं ? ती आपल्या घरीं नेहमींची येणारी !

बा०—देवानें गोड तोंड दिलं आहे—बहुमानानें बोलायला आपला कांहीं खर्च का होतो ?

सा०—मला नाहीं कुणी इतक्या लांब नांवानं हांक मारलेली आवडत. साळी ह्मटलं तरी चालेल. मी कुठे मोठी आहे ! साळुबाई ह्मटलं तर मी कधीं कुणालाच ओ द्यायची नाहीं.

चि०—साळी ह्मणून कां एकदां हांक मारायचं होईना ! पण ती काय ह्मणते तें एकदां ऐकायचं होतं.

बा०—साळू काय ह्मणते ? कायग साळू ?

सा०—( बोलत नाहीं, पण उगीच खालीं बसते. )

चि०—ती कांहीं नाहीं ह्मणत—आपल्या गोदीला पसंत करीत नाहींत ! ती लिहायला शिकली ह्मणून नवऱ्याला भाक्री भाजायला लावील ! !

बा०—आमची गोदी ल्याहायला शिकली, ह्मणून कां नवऱ्याला भाक्री भाजायला लावील ? आणि ह्मणून कां तिला कोणी पत्करीत नाहीं ? ! रे गुलामांच्यानों ! ! माझी गोदी कां वर आली होती ? इन्स्पेक्ट्राकडून मध्यस्ती

तुह्मीच ना आले होतेत ? आणि तोंडें वेंगाडून ह्मणालेत—कसेंही करून घाला बाबा तुमची मुलगी शाळेंत.

सा०—असं बोलून आतां कांहीं उपयोग कां आहे ? त्या मेल्यांची कशी ती एकदां खोडच मोडली पाहिजे. त्या मेल्यांच्या नाकावर एकदां मिरीं वाटून लावा कशी. ती मोठीशी आगिनबोट मुंबईला जाते ना—तिच्यांत बसून जा कसे, नि आमच्या गोदीला एखादा चांगला फरडा नवरा पाहून या ! ( बचंभट येतो. )

ब०—नमस्कार नमस्कार, बरें खुशाल ना बाबा ?

बा०—( रागावलेला ) गेली आमची खुशाली चुलींत ! तुमच्या भिक्षुकीच्या तुकड्यांत कांहीं अंतर नाहीं ना ! मग बाबा खुशाल काय आणि बेखुशाल काय ? बेफिकीर !

ब०—काकू, आज बाबांची प्रकृती जरा तिखट दिसते !

चि०—तो देहस्वभावच पडला ! पहिल्यांदां लोकांच्या नादीं लागायचं, नि मग घोळ घालून बसायचं. मी तेव्हांच ह्मणत होतें, कां साळू तुला आठवतं ना ?—कीं माझ्या गोदीला ह्मणून शाळेंत नाहीं घालायची. पण ऐकावं कुणी भेलं माझं. मी आतां साफ सांगतें, माझ्या गोदीचं लगीन यंदाच्या मार्गेश्वरांत झालं पाहिजे. नाहीं तर मी जीव देईन.

ब०--गोदोला काय किडे पडले आहेत ह्मणून तिचें लग्न होणार नाहीं ! यंदा नाहीं पुढचे वर्षी, आजच काय त्याचें खोळंबलें आहे ? लोकांच्या मुली नाहीं कां मोठ्या होत ?

चि०--हें असलं तोंडदेखलं बोलणं मला समजतं. उद्या दुसराच तुह्मी एक घोळ घालून बसाल ! नाहींग बाई मी यंदा गोदीला लग्नावांचून ठेवायची ! मग कुणी कुणी ह्मणावं, कायग बाई, ही एवढी थोरली मुलगी न्हाण आल्यावांचून कशी राहील ! तुह्मीच ना ती कोणाचीशी बाईकडची गोष्ट सांगितली होतीत ?

बा०—बरें बचंभट, तुमच्या आढळांत एखादा मुलगा आहे का कोणाचा ?

ब०—हो हो. पुष्कळ मुलगे आहेत. पण तुमच्या योग्य व्याही आणि गोदी योग्य नवरा मात्र पाहिजे ! एवढेंच कठीण. पण काय हो बाबा, गोदीला तेरावें कां वर्ष लागलें ?

बा०—हो तोच तर तिचा माझ्या गळ्याला मोठा फांस लागून राहला आहे !

ब०—तर तर ! फांस ह्मणजे काय विचारावें ? हा ज्याच्या त्यालाच कळतो. साळूबाई, हा दुसऱ्याला समजायचा नाहीं हो ! आतांच्या मुलींना ह्मणजे काय ! अकरावें वर्ष

लागायची खोटी ! ! कीं, न्हाण आपलें ठेवलेलें ! आणि गोदीला ह्मणतां तेरा वर्षें झालीं ! ! ! पहा बुवा लवकर तिला नवरा. नाहीं तर लोक भलतेंसलतेंच उठवायचे ! काकू ह्मणाल्या ती गोष्ट कांहीं खोटी नाहीं. परवांच कां कर्धीसा रामभट सांगत होता, देशावर-वांईसच-एकाची, ह्मणजे-तो बिचारा गरीब होता, मुलगी आपली अशीच वाढली, आणि तिला परते आलें न्हाण, मग कांहीं कुणी तिच्याशीं लग्न करीना ! पुढें माजला घोळ-प्रायश्चित्त-दगड-आणि धोंडे ! असेच कुतर्क आपले हे खाण्यापाण्याचे लोक घेऊन बसायचे ! आहे खरें पंचाइतीचें कलम ! ! नवरा कसा मिळेल तो मिळो ! ! !

वा०—लावा तर खरा शोध एखाद्याचा. तुह्मी चार ठिकाणीं हिंडणारे लोक—

ब०—आढळांत एक येतो खरा. आमच्याच पलीकडच्या गांवचा-आणि आमच्याच यजमानाचा मुलगा, पण त्याला मथिवला पाहिजे. कां हो साळूबाई, आमच्या खवल्याशास्त्रिबुवांचा मुलगा-मोरेश्वर, गोदीला योग्य नवरा शोभण्यासारखा आहे-नाहीं ?

सा०—पण तो मेला खवल्या कुठून ऐकायला !—त्यानेंच तर मेल्यानें हें बंड उपस्थित केलन्, ह्मणतो कीं गोदी लिहायला शिकली, ती नवऱ्याला भाकी भाजायला लावील, ह्मणून तिच्याशीं लगीनच करायचं नाहीं. पण तो जर

लग्न करील, तर मुलगा नक्षत्रासारखा दाणा आहे !

ब०—दाणा पण दाणा—कसला ह्मणून सांगू ! ओझ्यांच्या ओझीं रोज उठून बुकें वांचतो ! आणि शंभर रुपये महिना एव्हांशींच मिळवितो ह्मणतात !

सा०—तें बघा मिळेल तर स्थळ हालवून.

ब०—पण हा खवल्याशास्त्री कसला चिकित्स आहे, तो आहे ना तुह्मांला ठाऊक ? बाबा गाडगीळांची मुलगी ह्मणण्याबरोबर तपकिरीमुद्धां नाक मुरडायचा—आधींच तो पडला आमचा यजमान ! त्याजपाशीं गोष्ट कशी काढावी ?

सा०—बाबा नाहींत कां तुमचे यजमान ? त्यांचंही हें काम केलंच पाहिजे. का बाबा, मी ह्मणतें असंचना ?

बा०—मला कांहीं सुचेनासें झालें आहे. वाटतें एकवार पोरगी मरेल तर बरें, नाहीं तर द्यावी परती विहिरींत ढकलून ! नको पिडा उगीच !

ब०—शिव शिव—

चि०—आग लागली त्या तोंडाला ! गांवांत आणखी कांहीं कुणाला मुली आहेत कीं नाहींत ! नसला आपल्याला नवरा मिळत तर मी पाहिन. बचंभट, तुह्मी त्याला कसंहि करून मथवा—मी कांहीं तुमचे श्रम फुकट जाऊं देणार नाहीं. चोळी लुगडं मी पण तुमच्या बायकोला नेसवीन.

ब०—छे छे,–काकू, तुह्मीं कां वेड्या झालांत! आ-ह्माला कशाला द्यायला पाहिजे? तुमचें घर ह्मणजे आमच्या यजमानाचें–मी पहातों त्याला मथवून–कां साळूबाई, यत्न करण्याचें काम माझें–यश भगवंताचें. खरें कां खोटें ह्मणतों मी?

सा०—बाबानां विचारा, नि त्यांचा रुकार घ्या आधीं-

ब०—कां बाबा, स्थळ कसें काय आहे? येतें का मनास?

बा०—स्थळ बरें आहे–तिनें पसंत केलें ह्मणजे जमवा, आजि ठरवा.

ब०—बरें पण साळूबाई, ही गोष्ट तिसऱ्या कानीं मात्र जातां उपयोग नाहीं.

सा०—मी ह्मणतें आळीमिळी गुपचिळी-मी हो कशाला बोलूं? भलतंच नाहीं तसलं!

ब०—बाबा, काकू, तुह्मीं आतां स्वस्थ असा. ईश्वर करील तर हाच घाट गोदीच्या लग्नाचा जमून येईल. मी चार खटपटी करून हें ब्रह्मसूत्र जमवितों. असंचना साळू-बाई!! येतों तर आतां मी–नमस्कार. (जाऊं लागतो.)

चि०—बचंभट, हें बोलणें इथेंच राहील हो.

सा०—बचंभटजींनीं एखादं काम एकदां हातीं धरलं ह्मणजे त्याच्यावांचून त्यांना दुसरं कांहींच सुचत नाहीं.

ब०—छि अरे राम, हें बोलणें आतां हृदयांत रहालें घरीं जाऊन आतां याच उद्योगाला लागतों. ( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

### पात्रें.

### मोरेश्वर आणि चिंतामणी

### स्थल—मोरेश्वराच्या घराची पुढली ओटी.

मो०—Well Mr. Chintu, I am extremely happy to inform you, that I have received a successful letter from Bachambhat. In it he says:— ( हातांत पत्र घेऊन ) मुलगी तर फार चांगली, आणि अंगानें धष्टपुष्ट व गोंडस आहे !

चिं०—अरे, इतक्यांतच तोंडाला पाणी सुटूं देऊं नकोस ! अजून तुला तिला पहायची आहे !

मो०—अरे आणखी तर ऐकशील तो काय लिहितो तें ?—लिहितां वाचतां येणारी असून गोरीपान आहे !

चिं०—लिहिण्या वाचण्याचारे गोरेपणाशीं काय संबंध आहे !

मो०—हें पहा, हे कीं नाहीं तुह्मी असल्या वेडगळ समजुतीचे लोक ! आणि तुमच्या सारखे तारे उत्पन्न झाल्याकारणानें या देशाची खराबी करून टाकलीत ! सौंदर्य आणि नखरा पहिला, मग विद्या आणि सारें दुसरें !

चिं०—हो खरे बुवा, मी विसरलों ! तुमच्या सारख्या सुधारक पुरुषांना सौंदर्य आणि नखरा पाहिल्यानें पाहिजे ! आमचा आपला वेडगळ समज—ओबड धोबड बायको असली, ह्मणजे तिला फारशी कसली भीती नाहीं !

मो०—समजलास ! याच करितां हें मोठ्या महत्वाचें काम आमच्या खवलेशास्त्र्यावर मी सोंपाविलें नाहीं ! ज्या ८० वर्षांच्या थेरड्याला प्रवासांत साधारणपणीं कसें वर्तावें याचें ज्ञान नाहीं, त्याच्यानें कां जन्मभर गांठ पडणारा जोडा आमच्या मनासारखा पैदा करवणार !

चिं०—हो खरी गोष्ट ! तुह्मी पडलेत दीडशहाणे ! तो ह्मातारा पडला जुना कपी ! त्याला हे तुमचे वेडेचाळे कधींच आवडावयाचे नाहींत ! तुह्मीच समजलात, आणि त्याच्यावरची ही काढलीत ! फारच उत्तम—ह्मणजे सोन्याहून पिवळें झालें ! गृहस्था, तुझा तो बाप! येथें आला तर बाप अशी ओळखही दिली नाहींस ! बिचारा खचितच तो श-

ह्यांणा; ह्मणून मुकाट्यानें परत गेला. कारण; त्याला आहे आजपर्यंत मिळविलेल्या अब्रूची चाड!!!

मो०—Well let that go now–I have all my ideas reformed. बरें पण जाण्याचें कसें काय करावें? तुला तर आलेच पाहिजे माझ्या बरोबर. आणखी कोण कोण बरें बरोबर न्यावे! मला वाटतें–आपल्या डॉक्टर फ्रेंडला बरोबर घ्यावें. कारण त्याचा आपल्याला या कामांत फार उपयोग आहे.

चिं०—वारे! डॉक्टराचेंरे काय काम आहे? तो प्रभु, आपण ब्राह्मण, आपल्या खेडेगांवांत त्याचें कसें जमणार?- मी तर नाहींच यायचा, कारण रजा मिळायची मला कठीण पण वाटतच असेल, तर नरशा आणि केशा हे सध्या रिकामेच आहेत, त्यांना पाहिजेतर जा घेऊन.

मो०—But why can't you come? You must, and so we must have our Doctor friend!

चिं०—मला तर बुवा रजा नाहींच मिळायची. पण डॉक्टर फ्रेंड तुला बरोबर कशाला हवा?

मो०—We will be badly off without him.

चिं०—तेरे कसें?

मो०—अरे मुलीला मी स्वतः पसंत करीन, पण तो डॉक्टर फ्रेंड बरोबर असला, ह्मणजे तिला तो शारीरिक रीतीनें तपासील.

चिं०—लिहिण्या वाचण्याचारे गोरेपणाशीं काय संबंध आहे !

मो०--हें पहा, हे कीं नाहीं तुह्मी असल्या वेडगळ समजुतीचे लोक ! आणि तुमच्या सारखे तारे उत्पन्न झाल्याकारणानें या देशाची खराबी करून टाकलीत ! सौंदर्य आणि नखरा पहिला, मग विद्या आणि सारें दुसरें !

चिं०—हो खरे बुवा, मी विसरलों ! तुमच्या सारख्या सुधारक पुरुषांना सौंदर्य आणि नखरा पाहिल्यानें पाहिजे ! आमचा आपला वेडगळ समज—ओबड धोबड बायको असली, ह्मणजे तिला फारशी कसली भीती नाहीं !

मो०—समजलास ! याच करितां हें मोठ्या महत्वाचें काम आमच्या खवलेशास्त्र्यावर मी सोंपाविलें नाहीं ! ज्या ८० वर्षांच्या थेरड्याला प्रवासांत साधारणपणीं कसें वर्तावें याचें ज्ञान नाहीं, त्याच्यानें कां जन्मभर गांठ पडणारा जोडा आमच्या मनासारखा पैदा करवणार !

चिं०--हो खरी गोष्ट ! तुह्मी पडलेत दीडशहाणे ! तो ह्मातारा पडला जुना कपी ! त्याला हे तुमचे वेडेचाळे कधींच आवडावयाचे नाहींत ! तुह्मीच समजलात, आणि त्याच्यावरची ही काढलीत ! फारच उत्तम--ह्मणजे सोन्याहून पिवळें झालें ! गृहस्था, तुझा तो बाप! येथें आला तर बाप अशी ओळखही दिली नाहींस ! बिचारा खचितच तो श-

ह्याणा; ह्मणून मुकाट्यानें परत गेला. कारण; त्याला आहे आजपर्यंत मिळविलेल्या अब्रूची चाड !!!

मो०—Well let that go now-I have all my ideas reformed. बरें पण जाण्याचें कसें काय करावें? तुला तर आलेच पाहिजे माझ्या बरोबर. आणखी कोण कोण बरें बरोबर न्यावे! मला वाटतें—आपल्या डॉक्टर फ्रेंडला बरोबर घ्यावें. कारण त्याचा आपल्याला या कामांत फार उपयोग आहे.

चिं०—वारे! डॉक्टराचेंरे काय काम आहे? तो प्रभु, आपण ब्राह्मण, आपल्या खेडेगांवांत त्याचें कसें जमणार?- मी तर नाहींच यायचा, कारण रजा मिळायची मला कठिण पण वाटतच असेल, तर नरशा आणि केशा हे सध्या रिकामेच आहेत, त्यांना पाहिजेतर जा घेऊन.

मो०—But why can't you come? You must, and so we must have our Doctor friend!

चिं०—मला तर बुवा रजा नाहींच मिळायची. पण डॉक्टर फ्रेंड तुला बरोबर कशाला हवा?

मो०—We will be badly off without him.

चिं०—तेरे कसें?

मो०—अरे मुलीला मी स्वतः पसंत करीन, पण तो डॉक्टर फ्रेंड बरोबर असला, ह्मणजे तिला तो शारीरिक रीतीनें तपासील.

चिं०—मुलीला शारीरिक रितीनें कसली तपासणार ? खुळा नाहीं तर !

मो०—Don't you recollect, we read somewhere last month, कीं असेंच एक लग्न झालें, आणि मग पुढें लग्न झाल्यावर मुलीला झांकलेल्या शरिराच्या भागांत कांहीं खोड होती, आणि ती मग उघड, कीस आली ! तेव्हां त्याजबद्दल एडिटरानें रिमार्क केली होती, कीं हा असा परिणाम घडून येण्याचें कारण, नवरी पहिल्यानें डॉक्टराकडे तपासण्याकरितां पाठविली नव्हती ! तेव्हां अशी घोड्या एवढी चुक करणें माझ्या सारख्या विद्वानाला योग्य नाहीं. ह्मणून दुसरें कोणी न आलें, तरी डॉक्टरला पण मी नेणारच, आणि त्याच्या कडून हांतकरूमडमसाहेबांस तपासविणार ! अरे, असें करण्यांत आणखी एक फायदा आहे, कीं ती येव्हांपासून धीट होईल !

चिं०—वाहवा वाहवा ! काय तुमच्या हा शहाणपणाचा दिवा लागला ! ! ! तुह्मां एल्एल्. बी. वाल्यांना लोक मूर्ख ह्मणतात-सर्वांनाच नाहीं-परंतु तें अशाच कारणांनीं— उगीच नाहीं ! अरे तूं ह्मणतोस ती बातमी 'पंच' पत्रांतली ! त्या पत्रांत निवळ थट्टा असतात. आणि ती बातमी खरी असली ह्मण, ह्मणून असले वेडेचाळे कां करण्याची चाल आपल्यात आहे ? असलें शहाणपण घेऊन

घरीं जाऊन लोकांना दाखवूं नका, फुकट फजिती करून घ्याल, आणि हिरमुसलेलें तोंड घेऊन परत याल. सोडा छंद तो, आणि पुन्हां डॉक्टरचें नांव देखील काढूं नका माझ्या समोर.

मो०---( मनांत ) याची समजूत केली पाहिजे. ( मोठ्यानें ) बरें तर, तसें नाहीं करणार, पण डॉक्टर फ्रेंडला तर बरोबर घेतला पाहिजे. कारण आपली प्रकृती पहातोस ना, कशी बेताल झाली आहे ती ! आणि तूं तर बरोबर यायचा नाहीं म्हणतोस.

चिं---यायचेंच नाहीं असें म्हणत नाहीं, रजा मिळत नाहीं तेथें नाइलाज आहे. आणि तुला तर सद्यां टाऊक आहे, की एक मिनिटाचा उशीर झाला, तर चार स्टेप्स पहिल्या खेपेस खालीं जाण्याची वेळ येते, म्हणून केशाला बरोबर घेऊन जा, आणि फाजीलपणा न करतां तिकडच्या रिवाजाप्रमाणें सर्व करा. एकदां लग्न झालें म्हणजे झालें !

मो०---डॉक्टर फ्रेंड नेतों पण बरोबर.

चिं०---त्याच्या सोयीला आणि तुझ्या विचाराला आलें तर जा घेऊन त्याला. परंतु तो मुलीला उघडी करून तपासण्याचा मूर्खपणा मात्र करूं नका हो-जाण्यापूर्वी मला त्या डॉक्टराला एकदां भेटीव.

मो०---बरें तर, पत्र लिहून पुढच्या आगबोटींतून येतों

म्हणून बचंभटाला कळवितों. तिकडे गेल्यावर थोडी 'चेंज ऑफ एअर' ही पण होईल, आणि बरें वाटेल. चल जेवायला, आज जेव येथेंच ( दोघे जातात. )

---

## प्रवेश ८ वा.

### पात्रें.

मोरेश्वर, डॉक्टर, नरशा, केशा, बचंभट, बाबा गाडगीळ, तात्या, गोदावरी, चिमाताई, साळू इत्यादि.

स्थळें—बंदर, रस्ता आणि बाबा गाडगीळाचे घर.

ब०—( आपल्याशीच, ) गोदी मोरेश्वराला मी खास देतों अशाबद्दलचा बाबा गाडगीळाकडून हुकार मिळेपर्यंत तर माझ्या जिवांत जिव येणार नाहीं. काय मजा पहावी, कीं जो कुणी म्हणून मुंबईहून येतो तो आपला मोरेश्वराविषयीं कसलसच सांगतो। देवाला ठाऊक ह्मणा तो काय खरें करीत असेल तें. लोकदृष्ट्या पाहलें तर आपण

कांहीं कोणती वाईट गोष्ट करतों आहों असें थोडेंच आहे। कोणाचेहि लग्न जुळत असेल तर चार गोष्टी खोट्यानाट्या बोलल्या तरी चालते। असा शोपट जनमार्गच पडला आहे! त्याला अनुसरून मी माझ्याकडून तर बाबांची अशी कानभरणी केली आहे-कीं कोणीही जरी मोरेश्वराविषयीं कसा हि मजकूर सांगितला, तथापि त्याच्यावर त्यांनीं विश्वास ह्मणून ठेवूंच नये. तोच मासला साळूबाईनेंहि पण काकूजवळ करून ठेवला आहे. आम्ही आपल्याकडून इतकी तयारी केली आहे-परंतु ह्मणतात नाहीं, बाब्या पडला प्रतापी। तशांतून एकटाच यायचा असतां, तर कसें तरी करून त्याला बेतावर ठेवतां आला असता. पण त्याच्या बरोबर यायची आहे मंडळी-तशांतून ती मुंबईची पंचमेळ मंडळी। ते त्यांनीं कां आपले येथें मुंबईचे कांहीं गुण उधळले---ह्मणजे बाबा गाडगिळाशीं आहे गांठ. लग्नाचें फिसकटायचें तें तर फिसकटेलच, परंतु हें लग्न जुळविल्याबद्दलच्या कामगिरीचा मुशाहिरा मिळणें एकिकडेच राहून मोरेश्वराऐवजी बाबाकडून असला नवरा मुलगा पाहून दिल्याबद्दल योग्य बक्षीस पदरांत घ्यावें लागेल। पाहूं या- आपला सहाकारी देव आहे. ( पत्र हातांत घेऊन. ) या पत्राप्रमाणें म्हटलें, ह्मणजे मोरेश्वर आजच्या आगबोटीतून यावा, किती मंडळी बरोबर आणतो आहे, आणि काय

करतो आहे, हें जर आधीं कळतें, तर तशा बेतानें त्यांची व्यवस्था ठेवतां आली असती-परंतु तो त्या होडींतून आलेला दिसतो-( इतक्यांत. )

मो०—( किनाऱ्यावर ) ओहो ! बचंमट, आह्मी तुमचीच इच्छा केली होती ! बरें कसें काय पोरीचें ? तयारी सारी ! येथें फार दिवस रहाण्याला आह्मांला सवड बिलकूल नाहीं. कारण ही पहा आमच्या जवळ कसलीं कसलीं धेंडें आहेत ! कोणी डॉक्टर आहेत, कोणी बी. ए. आहेत, कोणी एम. ए. आहेत-

ब०—( मनांत ) लोक सांगतात तसा हा वेढगळ दिसतो खरा ! परंतु याच्यापाशीं आपल्याला दोन कामें आहेत. एक हाताला लागतील तितके पैसे उपटण्याचें, आणि दुसरें याचें लग्न ठरवून देण्याचें. ( मोठ्यानें ) हो हो, ती सगळी तयारी मजकडून लेस आहे ! पण पैशाचें—

मो०—अं: ! पैशाविषयीं अगदीं बोलूं नका. हे पाहिजे तर घ्या तूर्त खर्चाला ( ५० ची नोट खिशांतून काढून देतो. )

ब०—वः ! एकून मोरोबा हाताचा उदार खरा ! ! अहो ह्मणतात नाहीं " दाम करी काम " —आतां पाहिजे तर इंद्राची रंभा देखील आणून देईन. मोरोबा, मुलगी-

तर तुझ्याकरितां सुरेख पण सुरेख शोधून काढली आहे ! तूं तिला पहाण्याबरोबर पण माझी पाठच थोपटावीस !

मो०—पैशाबद्दल अगदीं डगमगूं नका तुह्मी !

ब०—असें असेल तर आतांच मुलीच्या घरीं चलाना ! तुह्मी मुलगी पसंत करून माझ्या घरी जाऊन पोचतां, तों मी नक्की देणें घेणें ठरवून येतों. दोन अलिकडे कां पलिकडे ह्मणून आतां पहात नाहीं ! ( मनांत ) मला तरी बोलण्यांत असें सोडवून घ्यायलाच पाहिजे होतें.

मो०—( थोडा विचार करून ) काय गोष्ट बोललां ! चला तर पहिल्यांदांच मुलीच्या घरीं ! आमच्याकडून तयारी आहे. ( बचंभट पुढें चालूं लागतो ) Well Doctor ?

डॉ०—यस–तुझा प्लान ह्मणजे कांहीं विचारायला नको–

मो०—( जातांना ) येथें या लोकांना असें कांहीं दाखविलें पाहिजे, कीं आपल्याला एक मिनिट देखील व्यर्थ घालवायला वेळ नाहीं.

डॉ०—पण आपल्या रामबाण औषधांच्या जाहिराती येथें वाटायला पाहिजेत–

मो०—त्या सगळ्या गोष्टी करायला आपल्याला पुष्कळ वेळ आहे.

डॉ०—It will be better if we can get any Agent here to sell our Patent Medicines मला वाटतें, तुमचा बचंभट आमच्या एजंटाचें काम करील; आपली सारी पेटंट मेडिसिन्स आहेत, तीं किंमती घेऊन नांवाप्रमाणें विकायचीं—

मो०—त्याला चांगलें मक्कम कमिशन दिलें म्हणजे झालें.

डॉ०—Oh! we shall give him liberal commission. त्याला कांहीं फिकीर नाहीं. मात्र त्यानें आमच्या औषधांची गांवोगांव फिरून प्रसिद्धी आणि तारिफ केली पाहिजे, and took her आपल्या फॉसफरसच्या अंधेरात चमकणाऱ्या गोळ्यांच्या आंगीं असणाऱ्या दैविक तेजाची तो जों जों मातबरी वाढवील, तो तो त्यांचा खप या देवभोळया लोकांत वाढेल आणि त्यायोगानें आपला फायदा होईल.

मो०—आपण एका लग्नांत आणखी शेंकडोशें कामें करून घेऊं.

डॉ०—तशी तर केलींच पाहिजेत—म्हणजे आपण इकडे आणखी थोडे जास्त दिवस राहिलों तरी फिकीर नाहीं—

म०—Now here comes Gadgil 's house! Well बचंभट—बाबा आहेत कां आंत ?

डॉ०—Don't you be so impatient!

ब०—बाबा, आंत तुमची वाटच पहात उभे राहिले आहेत. पण थोडें मर्यादेनें हो—

मो०—Well then alright( आंत शिरल्यावर. ) बाबासाहेब आपलेंच नांव काय ?

बा०—( मान हालवून. ) हो, या बसा.

मो०—बसायला आह्मांला वेळ कुठें आहे ह्मणा. पण आह्मांला आधीं असें सांगा, कीं तुमच्याच मुलीचें नांव गोदावरी आहे काय ?

बा०—होय, तिचें नांव गोदू—

मो०—Well गोदू कां होईना !

ब०—( मनांत ) हा बाळ्या आतां आपलें तोंड बंद करील तर बरें !

मो०—पण आतां या वेळेस ती आहे का आपल्या घरांत ?

बा०—पहातों—गोदे अग गोदे. ( आंतून तिचा भाऊ येतो. )

ता०—बाबा ती मघांच शाळेंत गेली आहे.

मो०—Never mind—पण तिचा आमच्या बरोबर विवाह करावा, असा तुमचा विचार आहे काय ? असल्यास हो ह्मणा लवकर, हं—नाहीं तर हे निघालों पहा आह्मीं दुसरीकडे. आमच्या सारख्या शहाण्याला मुलींचा काय तोटा आहे !

ब०—( मनांत. ) कसा आणि किती वेळां या बृह-स्पतीला सुधारून घ्यावा लागेल कोण जाणे ! मला जपा-याचे माझी मेहनत फुकट जाऊं नये ह्मणून. ( मोठ्यानें ) बाबा, मी सांगितल्याचा अनुभव आलाच हा ह्मणायचा. आमच्या मोरोबाचें अलिकडे अलिकडे तर फारच स्पष्ट बोलणें होत चाललें आहे ! त्याला लुचूपुचू ह्मणून कांहीं खपतच नाहीं ! हे आतां तुमचे जावई होणार. मुंबईतले हे फार जाडे विद्वान बनले आहेत. आणि त्यांच्या बरोबर मं-डळी आली आहे तीहि पण तशीच जाडी आहे ! तात्या जाईल का गोदूला शाळेंतून घरी आणायला—कां मीच जा-ऊन तिला घेऊन येऊं ?

बा०—तुह्मी कशाला जाता, मीच जाऊन तिला घे-ऊन येतो.

मो०—Oh ! thank you Mr. Baba तुह्मी कशाला इतकी तसदी घेता ? आह्मीच शाळेत जाऊन तिला पहातों, ह्मणजे झालें. तुह्मी आमच्या बरोबर लग्न करण्याचा रु-कार द्या ह्मणजे बस्स. is it not Doctor better we should go to the school and examine her there?

डॉ०—Foolish way ! Don't be so im patient.

ब०—बाबा पहालेंत ना किती तरी तें साहेब लोकांचें

बोलणें यांच्या तोंडात बसलें आहे ! मला वाटतें हे लोक संध्या करीत असतांना देखील केशव नारायण हे त्याच मार्षेत ह्मणत असतील । एकून कोणतेहि काय, करावें तर त्यांत असें रंगून जावें ! शाबास मोरेश्वरा !--

बा०--बचंभट मीच जाऊन मुलीला शाळेंतून घेऊन येतों, ह्मणजे तिला येथें पहाण्यास बरें.

ब०--मोरोबा, बाबा ह्मणतात तसें कां होईना ? कारण ती मुलीची जात आहे, तिला पण समजलं पाहिजे तुह्मी कशाला आलां आहांत तेथें. नाहीं तर शाळांतून परिक्षा घेण्याकरितां रोज उठून पुष्कळ लोक येत असतात.

मो०--This is a better plan Doctor, and you must have a separate place. ( बाबाकडे वळून. ) बरें आहे तर, जाऊन घेऊन या लवकर. ( बाबा पोरीला आणायला जातात. )

ब०--मोरोबा, मुलगी आल्यावर आतां दृष्टीस पडेलच कसली पण हुषार आणि देखणी आहे ह्मणून सांगू--तुला पण ती चांगली मडम शोभेल ! पण येथें अहांत तोंपर्यंत आमच्या कोकणच्या रिवाजाप्रमाणें वागा हो. मी अंमळसा आंत जाऊन येतों.

मो०--बेलाशक जावें आंत आपण--कांहीं काळजी करूं नये. आमच्याबरोबर हे डॉक्टरसाहेब आहेतच--शिवाय हीं दुसरी मंडळीहि विद्वान आहेच. ( बचंभट आंत जातो. )

Well Doctor this is a good time now !

डॉ०—Certainly lucky time-

मो०—अहो छोटे गृहस्थ–तुमचें नांव आह्माला माहींत नाहीं, माफ करा. ही मुंबईची मंडळी आहे, त्यांना लागली आहे तहान, तेव्हां थोडेसें गोडें पाणी आपण आणाल काय ?

ता०—होय. ( आंत जाऊन तांब्या, दोन वाट्या व गुळाचा खडा घेऊन येतो. )

मो०—( इकडे तिकडे पहून )Get on that bottle please.

डॉ०—Don't you see where we are ?

मो०—Oh! don't care, its' a medicine! I will manage about it. [ तात्याकडे वळून ] अहो शहाणे गृहस्थ–तुह्मी पाणी तर आणलेंत खरें, मेनी थ्यांक्स–पण हा गूळ आमच्या मुंबईत घोड्याला किंवा बैलाला फार शिण झाला असतां त्याला खायला घालतात. आह्मी का जनावरें आहोंत ? जा आपला गुळ घेऊन आंत [ तात्या आंत जातो. ]

न०—मोर हें काय ? येथें बाटली फोडणें बरें नाहीं. ही कां मुंबई आहे ? पटदिशी कुणि पहालें, तर हं हं ह्मणतां गांवभर बभ्रा होऊन आपण दारूबाज ठरूं–फुकट

प्रायश्चित्ताचा मात्र घोळ पडेल, आणि गांवात कुणि देखील उभे करणार नाहींत.

के०—आपण नाहींरे बुवा याला कबूल. याला पाहिजे तर घेऊं दे.

डॉ०--बाबा यायला झालें, and it will give smell—

मो०--आपल्या बरोबर डाळचुरमुरे आहेतच--

डॉ०--It will intoxicate us!

मो०--Nonsense! ओन्लि चार फिंगर्स घेतली ह्मणजे झालें!

डॉ०— Four fingers! by God! It will put you out of order!

मो०—Get out the bottle बस्स!

डॉ०—No, I shan't now—unless we get out hence

मो०--[ डॉक्टरच्या खिशांतून बाटली काढूं लागतो. ] Don't you be so fool like these fellows-they are timid, and their minds are not properly cultivated-It's a good time-none is here.

डॉ०--Oh, wait, but I will give you only one finger.

सगळे एकदम०—बस्स-तितकी चालेल, पण जास्ती नाहीं हो. [ दारू पिण्याचा व डाळचुरमुरे फावण्याचा

थाट उडतो. बचंभट बाहेर येतो तों त्याला थोडा संशय येतो; इतक्यांत बाबा गोदीला घेऊन येतात. ]

बा०—गोदे, ये अशी इकडे पाहूं

गो०—( येते व मर्यादेनें उभी रहाते. )

मो०—( तिच्याकडे पाहून ) या या अशा पुढें या. तुह्मी आह्मांला वर मान करून नीट रेखून पहा. आह्मीहि पण तुह्मांला तसेंच पाहूं—कारण लाज धरण्याची ही वेळ नाहीं. आणि आह्मांला लाजरा स्वभावहि नको—आपली आतां जन्माची पडणार आहे गांठ. ह्मणून आह्मी तुमच्या पसंतीला उतरलों पाहिजे, त्याच प्रमाणें तुह्मीहि पण आमच्या पसंतीला उतरला पाहिजे ! मग पुढें ठराव !

ब०—बाबा, पहालात ना बोलण्यांत कसा निर्मळपणा आहे तो ! यांचें ह्मणणें, मागाहून कांहीं लचांड निघावयाला नको—ते ह्मणतात आज कोणी आह्मांला फटकळ ह्मटलें तरी पत्करलें, पण आधीं गोड आणि मग कडू, हें त्यांच्या स्वभावाला नको. खपतच नाहीं ! गोदू, ये बाई जरा अशी पुढें.

गो०—[ लाजत लाजत पुढें सरते. ]

मो०—I will put her now only one or two questions. I say, Doctor, no doubt, she is a very handsome girl, an excellent match to me, stout and good-figured !

( गोदीकडे पाहून ) बरें, आपण शाळेंत जात असतां, तेव्हां वाचनाच्या पुस्तकांतून,-मी ह्मणतों तें लक्षांत घ्या आं नीट,-कांहीं कांहीं ठिकाणीं आपल्या आढळांत आलेंच असेल, कीं स्त्रिला पति, आणि पतिला स्त्री, उभयतांच्या इच्छेनुरूप निवड करून वरण्याची चाल नाहीं, ह्मणून आमच्या लोकांत पुष्कळ विजोडे-ह्मणजे एकमेकाला एकमेक आवडत नाहींत, आणि त्यांचा संसार सगळा मातींत जातो-

गो०—( रेखून मोरेश्वराकडे पहाते, आणी पुन्हां खालीं मान घालते. )

मो०—अरे समजलीरे समजली ! मी समजलों या मुक्याचा अर्थ-आपल्या मनांतून आपल्या वडिलांना आमच्या देखत मूर्ख ह्मणायचें नाहीं ! त्यावरून आपण फार सुज्ञ आहांत अशी आमची खातरी होते. आतां आपली आह्मी कांहीं खोटी करीत नाहीं, कारण उभें राहून आपले पाय दुखूं लागले असतील ! आणि बसा ह्मणून सांगितलें, तर आपण कांहीं आमचें आजच ऐकणार नाहीं ! ह्मणून एक गोष्ट विचारतों ती सांगा ह्मणजे झालें-ती अशी कीं हातावर हात मारतात त्याला काय बरें ह्मणतात !

गो०—( लाजल्यासारिखें करून. )

मो०—बोला बोला ! आपण आतां कोणाची भीड

धरतां! आज नाहीं बोलला, तरी लग्न झाल्यावर बोललें पाहिजेच कीं नाहीं? मग सांगायला काय भय वाटतें, आणि हें तर प्रश्नाचें उत्तर आहे!

गो०—त्याला टाळी ह्मणतात.

मो०—शाबास—पण ती टाळी देण्याचा अर्थ काय? हाहि एक प्रश्नच आहे समजा.

गो०—कांहीं एक विषयाच्या संबंधानं बोलणं चाललं असतां त्या विषयाचं सत्यत्व बाहेर पडल्याच्या योगानं जो आनंद होतो, त्या आनंदाची दर्शक टाळी आहे!

मो०—वाहवा वाहवा, मोठें पसंत उत्तर दिलें! बरें पण आणखी कशाला टाळी ह्मणतात?

गो०—मला नाहीं बाई ठाऊक—

मो०—करा करा, आठवण तर करा.—तुमच्या सारख्या एज्युकेटेड मुलींनीं ठाऊक नाहीं ह्मणणें शोभत नाहीं, असें खरें कीं नाहीं?

गो०—वचन ह्मणतात.

मो०—(आनंदानें) Here my questions are finished! बरें वचन ह्मणजे काय सांगा पाहूं?

गो०—हें बाई काय सांगायचं—त्याला प्रेमभाक नाहीं का ह्मणत!

मो०—That's right, that's what I meant! वचनाला प्रेमभाक ह्मणतात, ही गोष्ट खरी, तर

आतां आपल्याला मी ह्मणतों, भीड कशाला पाहिजे? मी जर आपल्या पसंतीला पडलों असेन, आणि त्या बरहुकूम नीट लक्ष्यांत घ्या,—हाच आपला लग्नाचा करार खरा आहे—मी पती व्हावा अशी आपली सम्मती असल्यास या मंडळीच्या देखत द्या तर पाहूं (हात पुढें करतो.) एकदां टाळी !

गो०—(टाळी देते आणि लाजून आंत जाते.)

मो०—The battle fought and proved successful my good friends !

न०—Most fortunate you are !

के०—Really so !

डॉ०—God bless you ! ! !

मो०—आमचें दोघांचें तर तुमच्या समक्षच ठरलें! बचंभट, आतां बाबा काय ह्मणतात तें आंत जाऊन त्यांना विचारा, आणि लगेच कळवा कसें आह्मांला! आणि ठरवाच मुहुर्त. But one thing I forget altogether Doctor, and that of examining her by you—but let go now. I think, it would look absurd.

ब०—(मोरेश्वराकडे वळून) हो, मोरोबा, तुह्मीं आतां तो गडी बरोबर घेऊन आमच्याच घरीं जा, आणि स्नान-ह्निक करतां तों येथला विचार घेऊन आलोंच मी ह्मणा. (सर्व जातात) बाबा, हीं दोघांचीं आतां काय बोलणीं

झालीं तीं ऐकिलींत ना ! नवरा एकपट, तर आमची गोदी चौपट झाली आहे! तिला पण लोकांचे नवरे पाहून असें होऊन गेलें आहे, कीं माझें पण बाबा लग्न कधीं करतील! दोघांनीं आपापल्याला पसंत तर केलें–त्या बाबतींत आतां आपल्यावर ह्मणून शब्द रहाला नाहीं ! कां मी खरें ह्मणतों कीं खोटें ? आपला कसा काय यांना विचार कळवावयाचा ! हो पण खरें, काकूंचें या कामीं मत अगोदर घेतलें पाहिजे.

बा०—घरांत विचारलें पाहिजे. त्यांना आधीं पहिल्यानें पसंत पडलें ह्मणजे मग दुसरा विचार. ( इतक्यांत साळू घाईनें येते. )

सा०—किती तरी बाई दम लागला हा मला ! मोर आगबोटींतून उतरून इकडे बाबांच्या घराकडे आला, बातमी मात्र मला पोंचली, कशाचं काय, हातचं काम तसंच जाग्यावर टाकून धूम घेतली! मला असं झालं कीं मी केव्हां जाऊन पोंचतें. ( आंगावरचें धोतर काढून ) पहा बाई ! मुलगी कोणाची, मुलगा कोणाचा, नि पुळ्यांच्या गणपतीला नवस माझा ! कीं हें लग्न जमूं दे ह्मणजे मी एका पैशाची पुष्कळशी खडीसाखर वाटीन ! हो पण ताई आंत कां उभ्या ?

चिं०—आंत न् बाहेर कुठं असलं तरी सारखंच. गडे साळू, मुलगा बरा आहेसं मला वाटतं, नि तो उठून जर आमच्या घरीं चालून आला आहे, तर टाकावं परतं जुळवून एकदांचं, नाहीं का असं बरं !

सा०—ताई तुह्माला खोटं नाहींना वाटायचं, खरच सांगू का मी? या गोदीचें या मोराबरोबर लग्न व्हावं, ह्मणून माझे नवसांवर नवस चालले आहेत! गणपतीला खडीसाखर तर बोललेंच आहे, देवीला खेटे घालीन ह्मणून तर बोललेंच आहें, नि आतां येतांना, कुठला बाई हा मारुती कोण जाणं. वाटेंत भाग्या मारुतीसा, त्याला दिखील नवस केला! कां? कीं कोणचा तरी देव मला लवकर पावो! बाबा तुमच्या पसंतीला पडला का मुलगा!

बा०—साळू, तुझ्या मनांत भरला का तो नवरा—गोदीला ठिक होईल असा?

सा०—माझं वाटणं काय बाई मेलं! ताईच्या पसंतीला आला, बचंभटानीं रुकार दिला, ह्मणजे तो बाबांना दिखील पसंत पडेल! बचंभट तुह्मीं आतां पहालातना त्याला!

ब०—हो. मी काय त्याला आज नव्यानें पहातों! पण मीचसा काय, बाबांनीं, काकूंनीं, आणि गोदीनेंहि पण त्याला पहाला!

सा०—हा मेल्यानों, गोदीनं पण दिखील का त्याला पहालं? कुठें आहे ती गोदी—गोदे, ये पाहूं अशी माझ्यापुढें, तुला आवडला का तो नवरा?

गो०—साळूअक्का, बज बर का तूं, माझी अशी थट्टा करीत जाऊं नकोस.

सा०--अळळळ ! किती तरी बाई हा राग एका माणसाच्या नाकावर येऊन बसला आहे ! आईच्या, बाबांच्या, बचंभटाच्या देखत नवरा पहावा, नि आपणच रागवावं ! वाग गोदे ! नवरा तुला, नि दगदग नि नवस मला !

गो०—बघ आं आतां, मी चिमटे घेईन तुला.

बा०—गोदे एक, आपण असें बोलूं नये. बचंभट तुमच्या सगळ्यांच्या मनांत तो नवरा भरला, तर मी गोदी त्याला देणार. आतां इतकेंच, पोरीचे ह्मणून पैसे मला घ्यायचे नाहींत, मी आपला दुधभात घालून पोरीला देणार, त्यांनीं मणिमंगळसूत्र घातलं तरी मला पत्करलें.

सा०—का हो बचंभट, तो मणिमंगळसूत्रच कां घालील ! चांगला हजार रुपयांच्या दागिन्यांनीं तो गोदीला मढवून काढील! पण बाबांचं ह्मणणं मात्र दुधभात! आपण नाहीं का कधीं त्यांनी कार्यं केलेलीं पाहिलीं ! ही आपली बोलायची चालच !

बा०--लग्न झाल्यावर त्यानें आपल्या बायकोला एक लाख रुपयांचे दागिने घातले, तर त्यापासून मला आनंदच आहे, परंतु माझी स्थिति मी सांगितली, कीं निवळ दुधभात जांवयाला जेवायला घालून मी कन्यादान करणार !

ब०--साळूबाई, बाबांचें असेंच नेहमीचें बोलणें असतें, तें आपल्याला नाहीं कां ठाऊक ! मी आतां मोरेश्वराला आपल्याच गांवीं राहून घेऊन लग्नाचा कायम घाट जुळवितों. तो माझें ऐकेलसें वाटतें. पण बाबा-लग्नाचें ठरलें असें सांगूं का त्याला !

बा०---कसें काय, सांगायचें ना असें ?

चि०---साळू, मी मघांशींच नाहीं का सांगितलें ! मला तो जांवयी आवडला, नि माझ्या गोदीचें लग्गीन पुढल्या महिन्यांत कांहीं ठेवायचं नाहीं.

बा०---बचंभट, जा आतां तुह्मी लवकर, आणि ठरलें ह्मणून सांगा. पण गोत्र मिळाल्यावर मात्र खास.

सा०---बचंभट, पण त्याला त्या मेल्या खवल्या-शारुच्याकडे मात्र जाऊं देऊं नका हो.

ब०---तें पहातों आतां कसें होईल तें. पण मी कांहीं बाबांच्या कामाकरितां आळस करणारा नाहीं. या बाबतींत खवल्याशारुचाचा मला शब्द लागला तरी मी पत्करीन. बरें आहे तर, येतों मी आतां बाबा. ( मागें पाहून ) काकू येऊं आतां—

चि०---साळूनं आतां काय सांगितलं तें लक्षांत ठेवा, नि मुहुर्त लवकर ठरवा.

बा०-बचंभट पाळीबिळीचा घरांत आधीं शोध करा हो.

ब०---त्याची सर्व काळजी आतां मला. मी आतां जाऊन संध्याकाळीं काय तें नक्की कळवितों. ह्मणजे साहित्याला लागायला बरें पडेल. येतों तर मी बाबा-नमस्कार. ( जातो. )

## प्रवेश ६ वा.

पात्रें—मोरेश्वर.

स्थळ—मोरेश्वरच्या घराचा दिवाणखाना.

मो०—( आपल्याशींच ) सावधान झालें. त्याच वेळीं मनाला चर्का बसला. आणि वाटलें, अरेरे ! लग्न केलें ही गोष्ट फार वाईट झाली ! कारण, आधींच माझी प्रकृती बिघडलेली, ( पत्र हातांत घेऊन व कपाळावर हात टेंकून ) तशांत हें आज श्वशुरांकडून पत्र आलें ! त्यांत ते लिहितात कीं सौ. ☼ ☼ ☼ ला ऋतु प्राप्त झाल्याकारणानें माहेरचा सोहळा आह्मीं सुरू केला आहे ! गर्भादान करण्या करितां तिला मुंबईस नेण्याची तजवीज करावी, ह्मणजे १६ दिवसांच्या आंत झाल्यास, नवीन मुहुर्त वगैरे पहाण्याची पंचाईत पडणार नाहीं ! या पत्राचें उत्तर आतां काय पाठवावें ? मोठी पंचाईत पडली ! तिला येव्हांशींच येथें न आणावी ह्मणावें, तरी चांगलें दिसत नाहीं. कारण, ती आतां ऐन उमेदींत आलेली ! तशांतून शिकलेली ! ह्मणजे जुन्या बायकां प्रमाणें तिला पापाची भीति नसणार ! अर्थात् मग ती जें पाऊल टाकील तें सरळच ! परपुरुषसंग, ज्याला आमचे जुने लोक व्यभिचार करणें, ह्मणजे स्त्रीजातीस महान् पातक समजतात, तें तिच्या तर खिजगणतींतलें ! तेव्हां अशा बायकोला तेथें एकटी न ठेवतां आपल्याजवळ आणून ठेवावी, मग त्यांत

निदान दाब तरी पुष्कळ राहील ! आपल्याजवळ ती अ-सतां कांहीं कमी ज्यास्त झाल्यास, त्याचा आपल्या मनानें तर कांहीं विधिनिषेध नाहींच—कारण सुधारलेल्या जगांत व्यभिचाराला पातक मुळींच ह्मणत नाहींत ! आणि आह्मी रिफार्म्ड नोशनचे असल्यानें तो विचार आह्माला सर्वथैव मान्य आहे. जुन्या चालीप्रमाणें कांहीं युक्ती आमचे खवलेशास्त्री काढते, पण लग्नाच्या भानगडींत तुह्मी पडूंच नका असा आमचा त्यांना हुकुम होता. बरें, लग्न केल्यावर तरी वायकोला घेऊन आह्मीं घरीं जावें, तेंहि गेलों नाहीं. तेव्हां खवलेशास्त्र्यांचा विचार आतां आह्मांला मिळत नाहीं ! महान् कोपिष्ट ब्राह्मण खरा ! असो. तिला आणली पाहिजे इकडे हें खरें. बरें कोणाबरोबर आणवावी ? पाठवायला तर तूर्त आपल्याजवळ कोणी माणूस नाहीं. पण डॉक्टर सॉलमन तिकडून यायचा आहे, आणि तो आपला डियर फ्रेंडहि आहे. लिहिलें, तर तो तिला घेऊन येईल. परंतु हे जात-भोळे लोक, त्याच्याबरोबर एकटीला पाठविणार नाहींत ! रहातां पैकीं एक उपाय, आणि तो, बाबानांच लिहावें, कीं पत्रदर्शनीं तुह्मीच तिला घेऊन मुंबईस या. मग येथला विचार आपण आल्यावर करूं. आतां मात्र आपल्याला एकादें छानदारसें टॉनिक (पौष्टिवर्धक) सुरू केलें पाहिजे ! (पत्र लिहितो—त्यांत बचंभट, सासूबाई वगैरे मंडळीस घेऊन येण्यास लिहितो. ) आलेल्या पत्राचा हा जबाब

लिहिला तेव्हां हें काम तर उरकलें ! आतां आपण आहोंत आणि डॉक्टर आहेत–तर चला आतां त्यांच्याकडे. (जातो.)

---

## प्रवेश ७ वा.

### पात्रें.

मोरेश्वर, चिमाताई, बचंभट, गोदी, तारी आणि दुसरी मंडळी.

स्थळ—मोरेश्वराचे घरचा दिवाणखाना.

( दिवसाचा विधि आटपल्यावर रात्रीचा शिष्टाचार. )

ब०—जांवई, घ्या एकदां गोदीला मांडीवर, आणि तोडा चार विड्या !

मो०—I say Buchambhut, you have made me a fool since this morning ! मी ह्मणतों, बचंभट, आज सकाळपासून तर तुह्मी आह्माला अगदीं मूर्ख करून सोडलेंत ! सुधारलेल्या लोकांत पहा. युरोप घ्या, अमेरिका घ्या, असल्या रानटी चाली कोणांत नाहींत !

तारी०—( गोदीची बहीण ) गोदे, टुणदिशी उठून मांडीवर बैस न् तोडा ह्मणावं विडी !

चि०—( सासू दरवाज्यांतून ) बचंभट आटपा लवकर, बाहेरच्या बायका घरीं जायला खोळंबल्या आहेत !

ब०—काकू, मी तर केव्हांपासून त्यांच्या पाठीस लागलों आहे ! ऐकलें का जांवई ! आंतून कोण काय बोलतें आहे तें ! सासुबाईची हौस आहे !

मो०—Let her do that ! त्यांना ह्मणावें तुह्मीच तोडा ! There's a man I think coming to me. ( इतक्यांत छापखान्यांतील रावजी शिपाई येतो. ) कोण आहिरे तो ? रावजी !

रा०—जी, नू शास्त्रीबुवांनीं हीं पुरफें तपासायला पाठवलीं हायेत.

मो०—Oh ! dam that Shastri Bava ! I have distinctly told him that he must manage some or how to-day, because I knew beforehand, I could not find time to-day, and still he sends the proofs here at such a late hour ! ! हा पहा काय त्रास आज आमच्या भोंवतीं लागला आहे ! मध्यरात्र झाली तरी तो सुटत नाहीं ! ! आणि हा तुमचा दुसरा तोडा विड्या—विड्या तोडा ! ! !

ब०—जांवई, आजचा हा दिवस आहे तुमचा विड्या तोडायचा ! उद्यां कोण तुह्मांला सांगतो ? आणि आजची ही अशी वेळ नसती, तर तुह्मांला तरी कोण विड्या तोडा म्हणून आग्रह करायला बसले होते ? हं ! तोडा विड्या, ओढून चंद्रबळ नको आणायला !

मो०—That's the way you have made this country so wretched ! याच कारणांनीं तुम्ही आमच्या देशाला भीक लावलीत !

ब०—बरें तोडायच्या आहेत का चार पिड्या!

मो०—Well Raoji, you must wait for a short time. रावजी तू बैस जरा! या कचाटांतून सुटूं दे आधीं आम्हाला! हं, बचंमट, होऊंद्या आतां तुमचें काय तें। (विड्या वगैरे तोडणें झाल्यावर मुलीला एकांतीं पाठवून लोक जातात.)

मो०—(खोलींत चष्मा लावून प्रुफें तपाशीत बसतो· गोदावरी एका बाजुला उभी राहते. ) यावें, अशा शेजारीं या आपण! उभ्या कां? आमचे पाय अशानें दुखूं लागतात! आपण खुशाल येथें येऊन बसावें, पाहिजे असेल तर बिछान्यावर निजावें, अथवा येथें पुष्कळ बुकें पडलीं आहेत त्यांजपैकीं एकादें घेऊन वाचित बसावें. इझीचेअर आहेच ही आपल्याकरितां!

गो०—(तशीच लाजून उभी राहते. )

मो०—(तपासलेलीं प्रुफें रावजीजवळ बाहेर येऊन देतो. आणि दार लावून पुन्हां एका खुर्चीवर वाचित बसतो. तीन वाजण्याचा समय होतो. ) कां—आपण आमचें ऐकायचें नाहींना? असा हा आजच नेम केला वाटतें?

गो०—(रागानें हांतुरुणावर एका बाजूस अस्ताव्यस्त पडते आणि तिला थोडी झोंप लागते. )

मो०—I think I shall be happy now, because she got sound sleep! (असें बोलून तिच्या शेजारीं जाऊं लागतो. )

गो०—( खडखडून जागी होते, आणि उठून बसते. ४ चा ठोका घड्याळांत पडतो. )

मो०—(दचक्यानें मागें सरतो. गोदावरी बसलेली दृष्टीस पडते. उरलेला वेळ कसा काढावा या विचारानें ) आपण गर्भाशयांतून निघाल्यावर ज्याच्या जोरावर आपण अन्न खाऊं लागतों, त्या दुधाची जागा किती मृदु आणि सुरेख असते ! हा पहालात ना काय विलक्षण प्रकार आहे ! हें काय असतें तें आपल्याला ठाऊक आहे काय ? ( ५ वाजतात. )

गो०–( अंगचा संताप होऊन आपल्याशींच पुटपुटते. )

मो०—( एका खुर्चीवर बसतो. ) आमच्या नुकतेंच कोठेंसें वाचण्यांत आलें आहे, कीं ( बुकें चाळतो. ) एका अमेरिकन् डाक्टरानें शारीर चिकित्सेंत त्याचा असा शोध लावला आहे कीं, स्तन ह्मणजे स्त्रियांच्या शरीराच्या उरपृष्ठभागावर दोन गोळे अति सूक्ष्म अशा पातळ पाकळ्यांचे एकावर एक अनेक थर बनून झालेले असतात ! ईश्वरानें हा काय विलक्षण देखावा आणि अकल्पित योजना केलेली आहे ही ! आपण कुठें होतां, आह्मीं कुठें होतों, पण दोघांच्या गांठी पहा कशा पडल्या ! कुठें ह्मणतात नाहीं डोंगरचे आंवळे आणि समुद्रांतलें मीठ ! काय उजाडलें वाटतें आतां ? आपल्याला खालीं जायचें असेल तर खुशाल जाव. कारण बाहेर उन्हें पडलीं.

गो०—( डोळे लाल करून दणादण जिना उतरत अति क्रोधानें अंधेरांत खांबापाशीं जाऊन उभी राहते. )

चि०—( मागच्या ओसरीवर माजा निसीत बसली आहे. ) तारे, अग गोदी अजून खालीं कां येत नाहीं ?

ता०—ती तर आई मघांच आली आहे. पण डोळे किनई अगदीं लाल करून खांबाजवळ उभी आहे !

चि०—खांबाजवळ उभी आहे न् डोळे लाल करून ! झाले असतील डोळे लाल—सारा दिवस काल होमाजवळ धूर लागला आहे, न् रात्रीं पण जागरण झालं आहे ! तशांतून झोंप पुरी न होऊन आळसाऊन खांबाजवळ उभी राहिली असेल ! गोदे, अग गोदे—

ता०—आई ती किनई डोळे चोळीत रडत बसली आहे !

चि०—कोण ? गोदी रडते आहे ! गोदे, अग गोदे, इकडे ये.

गो०—( फुसफुसत येऊन धाडकिनी आंग जमिनी-वर टाकते. )

चि०—गोदे, झालं तरी काय बाई तुला ! पोटांत का दुखतें ?

गो०—आग लागली माझ्या पोटाला ! ( उठून बसते. )

ता०—आई तिला किनई नवऱ्यानं मारली !

चि०—गोदे होतं तरी काय तुला ?

गो०—मसण होतं—

चि०—सांग तरी तुला काय होतं तें ? अग मी विचारते आहे हो.

गो०—आई, आतां काय डोंबल सांगू मी तुला !

चि०—अग, असं काय खुळया सारखं बोलतेस ?

गो०—आई, एलएल. बी. बरं—

चि०—गोदे, तुझं धड बोलणं दिखील मला समजत नाहीं!

गो०—आई, मला विहिरींत ढकलली असतीस किनई, तरी दिखिल—

चि०—गोदे, तूं शुद्धीवर आहेस का आज ? का तुला वायूबियू झाला आहे ?

गो०—मी चांगली शुद्धीवर आहें.

चि०—मग अशी भलतन्‌भलतं कायग बडबडतेस ! नि रडायलाग काय झालं ?

गो०—मी कांहीं भलतंसलतं बडबडत नाहीं—पण आई, एलएल. बीग. एलएल. बी. ! !

चि०—हें लबी लबी काय ह्मणतेस ?

गो०—आई माझं लग्न झालं नसतं तरी—

चि०—फिरून आपली—

गो० एलएल. बी. ग एलएल. बी.! ( पडते. )

चि०—गोदे, अग रात्रीं झालं तरी काय ?

गो०—व्हायचं तें काय ! गेल्यें तशीच परत आल्यें ! ह्मणून ह्मणतें बरं कां—

चि०—रात्रीं तुह्मी एकमेकांजवळ कांहीं बोललां नाहीं कां—

गो०—कशाचं बोलणं नि कशाचं काय! चल मला अशीच घरीं घेऊन कशी. एखादा पाणक्या नवरा मिळता तरी पत्करता. पण नकोग हा असला पुस्तक्या एलएल. बी. !!!

चि०—( कपाळावर हात मारून ) आतां पोरीचं रडण्याचं कारण समजलं! बाईग, नशिबाला आलं खरं तुझ्या असं! त्याला आतां काय करायचं आहे? ( पोटाशीं धरते ) उगी बाळे, रडूं नकोस बरं. तुला तर बाई आतां इथें एकटी टाकून जाण्याची सोय नाहीं. तूं पडलीस आतां उमेद्वार मुलगी, नि त्यांत ही मुंबईची वस्ती! मी आज चार दिवस तुझ्या घरचा रिवाज पहातें! मेलं नित्य उठून डोकंभर केंस राखलेले सोळभोंक येतच असतात नि पाहतें तों त्यांची सगळी नजर तुझ्याकडे! तें सगळं तुझ्या नवऱ्याला पाहलं तें आवडतें! शिकल्यानें लोक ह्मणतात मनुष्य शहाणं होतं—तो हा शहाणपणा चाहाटळगिरीचा! इश्य बाई! आमच्या इथल्या पुरूषांना असं घटकाभरहि खपायचं नाहीं! गोदे, तुला आतां इथें अशा स्थितींत एकटी टाकून जाणं मला बरं दिसत नाहीं. ह्मणून तुझ्या नवऱ्यालाच मी घरीं घेऊन जातें नि गटगट्या वैद्याच्या पायां पडून त्यांना चांगलं औषध देववीन. पण बाई, माझी आज बालंबाल खात्री झाली बरं! कीं, लोक सांगतात ती गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्या दोन दोन परीक्षांना काय आग

लावायची आहे ! मेली जिवंत प्रेतं खरीं ! नकोग बाई ! आग लागली त्या शहाणपणाला नि पैशाला ! ही एकदां मी फसलें तितकी पुरे ! माझ्या तारेला ह्मणून मी पुष्कळ इंग्रजी शिकलेला नवरा पाहून देणार नाहीं. जाडी भरडी भाक्री नि धडधाकड धडोती देणारा असला ह्मणजे पुरे. मी पण आतां माझ्या मैत्रिणींना लग्नाच्या बाबतींत असंच सांगेन. देवा, नकोरे आमच्या पोरींना या असल्या मरतुकड्यांशीं गांठ घालून मारूस ! ही कांहीं तुलाच दया येऊं दे. हेंच त्यांना शिकवायचं असलं, तर त्यांच्या शिकण्याबरोबर त्यांची शक्ति घेऊन जाऊन बुद्धीनें तरी त्यांना दुर्बल करूं नकोस !!! शिव शिव !!! देवा असेच का सगळे शिकलेले लोक असतील !!! नि त्यांच्या कां हातीं ही आमची सुजनता देणार ?–ह्मणजे आधींच आह्मीं अबला ह्मणजे विचारहीन.–त्यांत अशांची संगत !–ह्मणजे पातिव्रत्य धर्माचा लयच !–दुसरें काय !!!

श्री कृष्णार्पणमस्तु.

# मोर एल्. एल्. बी. प्रहसनावरील एका वर्तमान पत्राच्या अभिप्रायाचा सारांश.

( गोवापंच-ता. १४-७-८६ ) हें प्रहसन पुस्तक आह्मीं पुन्हां पुन्हां असें तीन वेळ वाचलें. या प्रहसनांत जें कांहीं लिहिलें आहे, तें शब्दशः खरें आहे, एवढेंच नव्हे, आह्मीं ज्या कित्येक इंग्रजी शिक्षणानें तर्र झालेल्या मंडळींशीं विशेष परिचय घडल्यामुळें त्यांचें वर्तन अनुभविलें आहे, त्यांत, आणि या प्रहसन पुस्तकांतील लेखांत मुळींच फरक दिसून आला नाहीं; उलटा, त्यांचें सद्धर्म बाह्याचरण व तेणेंकरून त्यांचे आंगीं असणारें पशुत्व व अमानुष कित्येक चाली, यांचा यथार्थ उल्लेख करतांना या प्रहसनकारानें लेखणीला सईल सोडली नाहीं, हा एक या पुस्तकांत दोष दृष्टीस पडतो. * * * * * * * *

हा पुस्तककर्ता मोठा धर्माभिमानी दिसतो. आणि त्यामुळेंच सुधारकांनीं आजकाल कित्येक विलक्षण प्रकारें जी स्वधर्मांत ढवळाढवळ चालविली आहे, ती व खऱ्या सुधारणेचें मूळ त्यांच्या मनांत न आल्यामुळें त्यांकडून होणाऱ्या देशाच्या व धर्माच्या हलाक स्थितीचें दिग्दर्शन अंतर्गत रीतीनें या पुस्तकांत त्यानें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. * * * * * * * * * * *

# मोर एल्. एल्. बी. प्रहसनावरील एका वर्तमान पत्राच्या अभि-प्रायाचा सारांश.

( गोवापंच-ता. १४-७-८६ ) हें प्रहसन पुस्तक आह्मीं पुन्हां पुन्हां असें तीन वेळ वाचलें. या प्रहसनांत जें कांहीं लिहिलें आहे, तें शब्दशः खरें आहे, एवढेंच नव्हे, आह्मीं ज्या कित्येक इंग्रजी शिक्षणानें तर्र झालेल्या मंडळीशीं विशेष परिचय घडल्यामुळें त्यांचें वर्तन अनुभविलें आहे, त्यांत, आणि या प्रहसन पुस्तकांतील लेखांत मुळींच फरक दिसून आला नाहीं; उलटा, त्यांचें सद्धर्म बाह्याचरण व तेणेंकरून त्यांचे आंगीं असणारें पशुत्व व अमानुष कित्येक चाली, यांचा यथार्थ उल्लेख करतांना या प्रहसन-कारानें लेखणीला सईल सोडली नाहीं, हा एक या पुस्त-कांत दोष दृष्टीस पडतो. * * * * * * * *

हा पुस्तककर्ता मोठा धर्माभिमानी दिसतो. आणि त्यामुळेंच सुधारकांनीं आजकाल कित्येक विलक्षण प्रकारें जी स्वधर्मांत ढवळाढवळ चालविली आहे, ती व खऱ्या सुधारणेचें मूळ त्यांच्या मनांत न आल्यामुळें त्यांकडून होणाऱ्या देशाच्या व धर्माच्या हलाक स्थितीचें दिग्दर्शन अंतर्गत रीतीनें या पुस्तकांत त्यानें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. * * * * * * * * * * *

हा पुस्तककार त्याच्या लेखणीवरून चांगलाच पोक्त, विचारी, अनुभवज्ञानानें कोंवलेला, विद्यामंडीत असा तर आहेच, पण याची भाषाशैली इतकी शुद्ध, रसाळ व सरळ आहे कीं, असे सभ्य लेख फारच थोडे दृष्टीस पडतील. या पुस्तकांत कर्त्यानें कित्येक पात्रांच्या बोलाचालींत अवश्य लागणाऱ्या ग्राम्य व असभ्य शब्दांना अजीबात फांटा दिला आहे, हें थोडेंसें विलग आहे खरें; परंतु पुस्तककर्त्यांच्या आंगीं जें खरें विद्वत्व व सभ्यत्व आहे, त्यांचेच तें दर्शक होय असेंच मानावें लागतें. * * * * *

---

कै. तो. रा. नारायण हरि भागवतकृत इहपर सुख-ज्ञान व स्वातंत्र्याची गोडी लावून देणारीं अपूर्व पुस्तकें—गीता-ज्ञानेश्वरीरहस्य (॥८) व सार्थ परमामृत (॥६) हीं दोन्हीं पुस्तकें एकदम घेणारास ट. व व्ही. पी. खर्चासह ॥१५ आणे.

---

## सुवासिक दंतरक्षक चूर्ण.

सर्व प्रकारच्या दंतविकारांवर उत्तम गुणकारी व तोंडाला रुचि आणणारें असें असून एक तोळ्याचे डबीची किंमत फक्त एक आणा. एक रतल ( ४० तोळे ) ला दोन रुपये. ट. ख. शिवाय.

# विक्रीस तयार.

## इतर कांहीं पुस्तकें.

| | कि. रु. | आ. | ट.ख. |
|---|---|---|---|
| श्री मद्भगवद्गीता ( मधुसूदनी टीकेसह ) | ४ | ० | \|= |
| श्री हरिगीता ( सप्तपंचक ) विद्यारण्याचे पंचदशी वरील अर्वाचीन ओवीबद्ध ग्रंथ | १ | ४ | ८– |
| अष्टांगसंग्रह मूळ ( वाग्भट ) | १ | ० | ८=\|\| |
| लघुयोगवासिष्ठ ( टीकेसह ) | ५ | ० | -\|\|- |
| महावाक्यरत्नावली (अठरा उपनिषदांचें रहस्य) | ० | २ | ८८ |
| माधवनिदान ( मधुकोश टीकेसह ) | १ | ० | ८= |
| धर्मसिंधू ( मूळ ) | २ | ० | -\|\|- |
| धर्मसिंधू ( भाषांतर ) | ६ | ० | \|≡ |
| श्री मंगलमूर्ती | ८८३ | | |
| विजयादशमी ( अथवा ) दसरा. | ८८३ | | |

याशिवाय इतर सर्व प्रकारचीं पुस्तकें मिळतात.

ठिः-फणसवाडी } शंकर नारायण भागवत
दिमोस्याची चाळ } नेटिव ओपीनियनप्रेस-गिरगांव मुंबई.